सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group
क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on


https://epaper.vidarbhaprajasattak.com | E-Mail : prajasattaknews24@gmail.com | RNI No. - MAHMAR 2023/84526 | Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - १८२ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## 'नेहरूंनी पाकिस्तानला मदत केली होती', 'सिंधू जल' करारावरुन पंतप्रधान मोदींचा काँग्रेसवर हल्लाबोल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ नवी दिल्ली**

पहलगाम हल्ल्यानंतर 'सिंधू जल' करार चर्चेत आला. भारत सरकारने ऑपरेशन सिंदूरच्या अगोदर सिंधू जल करार रद्द केला. यानंतर भारताने पाकिस्तानमधील दहशतवादी तळांवर हल्ले केले. या हल्ल्यानंतर दोन्ही देशांमध्ये तणाव निर्माण झाला होता. दरम्यान, आता सिंधू जल करारावरुन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी माजी पंतप्रधान जवाहरलाल नेहरु यांच्यावर टीका केली. 'संसद किंवा त्यांच्या मंत्रिमंडळाला विश्वासात न घेता पाकिस्तानसोबत करार सिंधू जल करार केल्याचा आरोप केला'नेहरूंनी देशाच्या हिताच्या किंमतीवर आपली




प्रतिमा उजळवण्यासाठी हे केले, ८० टक्क्यांहून अधिक पाणी पाकिस्तानला वापरण्याची परवानगी देण्यात आली, असंही मोदी म्हणाले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, त्यांचे सरकार त्या काळातील पापे धुवत आहे, नेहरूंनी नंतर एका सहकाऱ्याला सांगितले की त्यांना विश्वास आहे की हा करार पाकिस्तानसोबतच्या इतर समस्या सोडवण्यास मदत करेल, परंतु तसे झाले नाही.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिल्लीतील एनडीए संसदीय पक्षाच्या बैठकीत ही टीका केली. या दरम्यान त्यांनी एनडीएचे उपराष्ट्रपतीपदाचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांचाही सत्कार केला. याशिवाय, त्यांनी विरोधी पक्षांसह सर्व पक्षांना एकमताने राधाकृष्णन यांना उपराष्ट्रपती करण्याचे आवाहन केले.

पंतप्रधान मोदी आणि रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमीर पुतिन यांच्यात फोनवर चर्चा झाली आहे. पंतप्रधान मोदींनी स्वतः त्यांच्या एक्स हँडलवर याबद्दल माहिती दिली. विशेष म्हणजे, अलिकडेच पुतिन आणि अमिरेकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची अलास्कात भेट झाली. त्या भेटीकडे संपूर्ण जगाचे लक्ष लागून होते. आता त्या भेटीनंतर पुतिन यांनी थेट पीएम मोदींना फोन केल्यामुळे सर्वांच्या भूवया उंचावल्या आहेत.

पीएम मोदींनी त्यांच्या एक्स पोस्टमध्ये लिहिले की, आताच मित्र राष्ट्राध्यक्ष पुतिन यांच्याशी फोनवर चर्चा केली. राष्ट्राध्यक्ष ट्रम्प यांच्याशी अलास्कामध्ये झालेल्या अलिकडील भेटीची आणि चर्चेची माहिती दिल्याबद्दल पुतिन यांचे आभार. भारताने युक्रेन संघर्षाचे शांततापूर्ण मार्गाने निराकरण करण्याचे सातत्याने आवाहन केले आहे आणि या संदर्भातील सर्व प्रयत्नांना पाठिंबा दिला आहे.

## 'आम्हाला मतदान करा, राहुल गांधींना देशाचा पंतप्रधान करू', तेजस्वी यादवांची घोषणा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नवाडा**

काँग्रेस नेते राहुल गांधी 'मतदार हक्क यात्रे'निमित्त बिहारचा दौरा करत आहेत. राजद नेते तेजस्वी यादव हेदेखील त्यांच्यासोबत या यात्रेत सहभागी आहेत. मंगळवारी त्यांची ही यात्रा नवादा येथे पोहोचली आहे. यावेळी तेजस्वी यांनी एक मोठे विधान केले आहे. 'तुम्ही पुढच्या लोकसभा निवडणुकीत आमच्या महाआघाडीला मतदान करा, आम्ही राहुल गांधींना देशाचे पंतप्रधान करू,' असा दावा तेजस्वी यांनी केला आहे.



नवाडा येथे मतदार हक्क यात्रेला संबोधित करताना तेजस्वी यादव म्हणाले की, 'भाजप लोकांकडून मतदानाचा अधिकार हिसकावून घेऊ इच्छित आहे. निवडणूक आयोग आणि भाजपच्या लोकांना वाटते की, ते बिहारच्या लोकांना फसवतील. आम्ही बिहारी आहोत, हे त्यांनी लक्षात ठेवावं. मुख्यमंत्री नितीश कुमार बेशुद्धावस्थेत आहेत. त्यांचे २० वर्षांचे जीर्ण सरकार उखडून टाकावे लागेल. कोणत्याही जातीचा असो वा धर्माचा, आम्ही सर्वांना सोबत घेऊन जाऊ. आपण नवीन युगाचे लोक आहोत, बिहार हे सर्वात तरुण राज्य आहे, हे सरकार आपल्या तरुणांच्या भविष्याशी खेळत आहे,' अशी टीकाही तेजस्वी यांनी केली.

**राहुल गांधींचा निवडणूक आयोगावर निशाणा**

राहुल गांधी यांनी मुख्य निवडणूक आयुक्त आणि दोन्ही निवडणूक आयुक्तांना इशारा दिला की, जेव्हा त्यांचे सरकार स्थापन होईल, तेव्हा 'मत चोरी' विरोधात कठोर कारवाई केली जाईल. संपूर्ण देश निवडणूक आयोगाकडून प्रतिज्ञापत्र मागेल आणि वेळ मिळाल्यास त्यांचा पक्ष प्रत्येक विधानसभा आणि लोकसभा मतदारसंघात 'मत चोरी' उघड करेल. ज्याप्रमाणे पंतप्रधान नरेंद्र मोदी बिहारसाठी विशेष पॅकेजबद्दल बोलतात, त्याचप्रमाणे निवडणूक आयोगानेही बिहारसाठी 'नवीन विशेष पॅकेज' आणले आहे. त्याचे नाव एसआयआर आहे, जे 'मत चोरीचे एक नवीन रूप' आहे, अशी टीका राहुल गांधी यांनी केली.

## इंडिया आघाडीचं ठरलं, माजी न्यायमूर्ती सुदर्शन रेड्डी यांना उपराष्ट्रपतीपदाची उमेदवारी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नवी दिल्ली**

इंडिया आघाडीकडून उपराष्ट्रपतीपदासाठी उमेदवाराची घोषणा करण्यात आली आहे. सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांना उपराष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीत इंडिया आघाडीकडून उतरवण्यात आले आहे. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी बी. सुदर्शन रेड्डी यांच्या नावाची घोषणा केली आहे. इंडिया आघाडीने सर्वानुमते बी. सुदर्शन रेड्डी यांच्या नावावर शिक्कामोर्तब केला आहे, अशी माहिती काँग्रेसचे प्रवक्ते जयराम रमेश यांनी दिली आहे. बी. सुदर्शन रेड्डी यांची लढत 'एनडीए'च्या सी. पी. राधाकृष्णन यांच्याशी होणार आहे.

इंडिया आघाडीनं प्रसारमाध्यमांशी संवाद साधत उपराष्ट्रपतीपदासाठी बी. सुदर्शन रेड्डी यांच्या घोषणा केली. इंडिया आघाडीतील सगळ्या पक्षांची सहमती घेऊन बी. सुदर्शन रेड्डी यांच्या नावावर शिक्कामोर्तब केले, असे जयराम रमेश यांनी सांगितले. तृणमूल काँग्रेसचे खासदार डेरेक ओब्रायन यांनी म्हटलं की,



आम आदमी पक्षाचा सुद्धा बी. सुदर्शन रेड्डी यांना पाठिंबा आहे.सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, 'एनडीए'ने ज्याप्रकारे सी.पी. राधाकृष्णन यांना दक्षिण भारतीय असल्याचे पाहून उमेदवार केले आहे. त्याचप्रकारे इंडिया आघाडीने माजी न्यायमूर्ती बी. सुदर्शन रेड्डी यांच्या नावाची घोषणा केली आहे. यामुळे 'टीडीपी,' 'वाईआरएससीपी' आणि 'बीआरएस'सारख्या पक्षांना नेमके कुणाला पाठिंबा द्यावा? याबद्दल विचार करावा लागणार आहे.


## नरेंद्र मोदींना निवृत्त करून गडकरींना पंतप्रधान करा

### शेतकरी नेते किशोर तिवारी यांचे सरसंघचालकांना साकडे

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नागपूर**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना ७५ वर्ष पूर्ण होत असल्याने निवृत्त करावे. त्यानंतर २०१४ मध्ये पंतप्रधान पदाची संधी हिरावलेल्या नितीन गडकरींना पंतप्रधान पदाची संधी द्यावी, अशी मागणी करणारे खुले पत्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांना शेतकरी नेते किशोर तिवारी यांनी लिहले आहे.

किशोर तिवारी म्हणाले, मी यवतमाळ जिल्ह्यात मागील ४० वर्षापासून आदिवासी व वंचित शेतकऱ्यांसाठी काम करतो. माझे वडील पंडीत जमुनाशंकर तिवारी गुरुजी संघ जनसंघाचे १९६२



पासुन पूर्णवेळ प्रचारक होते. ते १९ महीने नाशिक येथे मध्यवर्ती कारागृहात होते. मला राज्यात भाजप सरकार असतांना शेतकरी स्वावलंबन उच्चाधिकार मिशनचे अध्यक्षपद देऊन राज्यमंत्रीचा दर्जा दिला गेला होता. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे एक जुने 'संघटन शिबिर प्रशिक्षित स्वयंसेवक असल्याने मी हे पत्र लिहित आहे.

देशाने मोदी यांना ११ वर्षे काम करण्याची संधी दिली. मोदी यांनी प्रभु रामचंद्राचे भव्य मंदिरासह अनेक चांगली कामेही केली. २०१२ मध्ये काही नेत्यांनी बोगस बिनबुडाच्या घोटाळ्याचा आरोप करणारा कट रचून नितीन गडकरी यांच्या पंतप्रधान पदाची संधी हिरावली होती. ही सर्व गोष्टी नितीन गडकरीना मी १४ डिसेंबर २०१२ ला सांगितल्या होत्या. परंतु पक्ष शिस्त अभूतपूर्व संयम यामुळे ते त्यावेळी चूप राहिले होते. आज या कटात सहभागी असलेले जेष्ठ नेते लालकृष्ण अडवाणी व प्रकाश जावडेकर जिवंत असून ते सत्य जगाला सांगतील व नितीन गडकरी यांची माफी मागतील, अशी मी अपेक्षा करतो. नितीन गडकरी यांची कार्यसम्राट व सर्वांना घेऊन चालणारे मंत्री म्हणून ख्याती आहे. त्यांना सर्वदूर मान्यता आहे. त्यामुळे त्यांना २०२९ च्या लोकसभा निवडणुका पूर्वी उरलेली चार वर्ष देशाचे नेतृत्व करण्याची संधी द्यावी व देशाला त्यांचे नेतृत्वात पुढे नेण्यासाठी एक सकारात्मक बदल घडवून आणावा, अशी विनंती मी आपणास करीत असल्याचेही किशोर तिवारी यांनी पत्राद्वारे मोहन भागवत यांना सांगितले.

## उत्तराखंड विधानसभेत राडा, टेबल आपटलं माईक तोडला, संतापलेल्या अध्यक्षा निघून गेल्या

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ देहरादून**

उत्तराखंड विधानसभेच्या अधिवेशनादरम्यान आज कामकाजाच्या सुरुवातीलाच जोरदार गोंधळ झाला. कामकाजाला सुरुवात होताच विरोधी पक्ष असलेल्या काँग्रेसच्या आमदारांनी हौद्यात उतरून घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. राज्यातील बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था, पंचायत निवडणुकीत झालेला गोंधळ यावर विशेष चर्चेची मागणी करत विरोधकांनी आक्रमक पवित्रा घेतला होता. या गोंधळामुळे विधानसभेचे कामकाज वारंवार स्थगित करावे लागले.



आज विधानसभेच्या कामकाजाला सुरुवात झाल्यावर प्रश्नोत्तराच्या तासादरम्यान ११ ते १२.३० या वेळेत विरोधकांनी वारंवार गोंधळ घातला. या दरम्यान, विरोधी पक्षातील काही सदस्यांनी थेट हौद्यात धाव घेत गोंधळ घालायला सुरुवात केली. यावेळी काही आमदारांनी सचिवांचं टेबल उचलून उटलं केलं. तसेच टेबलावरचे माईकही उखडून काढले. त्यामुळे संतप्त झालेल्या विधानसभा अध्यक्ष सभागृहातून निघून गेल्या.

विरोधी पक्ष राज्यातील बिघडलेली कायदा आणि सुव्यवस्था, पंचायत निवडणकुती झालेला गोंधळ यावरून चर्चेची मागणी करत होते. पंचायत निवडणुकीत सरकारच्या इशाऱ्यावर कायदा आणि सुव्यवस्थेचे तीन तेरा वाजवले गेले, असा आरोप काँग्रेसचे आमदार प्रीतम सिंह यांनी केला.

## आशिया कपसाठी सूर्याच्या शिलेदारांची निवड

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

आशिया चषकासाठी भारतीय संघाची आज घोषणा करण्यात आली आहे. सूर्यकुमार यादव याच्याकडे टीम इंडियाची धुरा असेल तर शुभमन गिल याला उपकर्णधारपदाची जबाबदारी देण्यात आली आहे. वेगवान गोलंदाज जसप्रीत बुमराह यालाही संघात स्थान मिळाले आहे. वर्कलोडमुळे जसप्रीत बुमराहच्या निवडीवर प्रश्नचिन्ह होते, पण त्याला आशिया चषकासाठी संघात स्थान देण्यात आले आहे. श्रेयस अय्यर आणि मोहम्मद सिराज यांना संघात स्थान मिळाले नाही. हार्दिक पांड्या याची उपकर्णधार म्हणूनही निवड झाली नाही, त्याऐवजी गिल याच्याकडे जबाबदारी सोपवण्यात आली आहे. हा हार्दिक पांड्याला




धक्का मानला जातोय.

आशिया चषकाच्या संघात जसप्रीत बुमराह आणि कुलदीप यादव यांच्यासारख्या प्रमुख खेळाडूंची पुनरागमन झाले आहे. याशिवाय, अभिषेक शर्मा, संजू सॅमसन, तिलक वर्मा, हार्दिक पंड्या, शिवम दुबे, अक्षर पटेल, जितेश शर्मा, अर्शदीप सिंग, वरुण चक्रवर्ती, हर्षित राणा आणि रिंकू सिंग यांचा समावेश आहे. प्रसिद्ध कृष्णा, यशस्वी जायसवाल, वॉशिंग्टन सुंदर, ध्रुव जुरेल आणि रियान पराग हे स्टँडबाय खेळाडू म्हणून निवडले गेले आहेत.

## पक्षाचा विरोध झुगारून काँग्रेस नेते नितीन राऊत यांचा शक्तिपीठ मार्गासाठी फडणवीसांना पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ नागपूर**

गोवा शक्तिपीठ मार्गाला काँग्रेस पक्षाचा विरोध असतानाही माजी मंत्री व काँग्रेसचे ज्येष्ठ नेते नितीन राऊत यांनी मात्र या मार्गाबाबत समर्थन व्यक्त केले आहे. राऊत यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र लिहून विदर्भाच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने दिल्ली-नागपूर-हैदराबाद कॉरिडॉर, नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग आणि प्रस्तावित नागपूर-गोवा शक्तिपीठ मार्गाचे एकत्रीकरण असे सुवर्ण त्रिकोण उभारण्याची मागणी केली आहे.

दिल्ली-नागपूर-हैदराबाद औद्योगिक कॉरिडॉर याला नागपूर-मुंबई समृद्धी महामार्ग आणि प्रस्तावित शक्तिपीठ नागपूर-गोवा महामार्गाबरोबर जोडण्यात यावे. यामुळे भारताचा पहिला सुवर्ण त्रिकोण आर्थिक झोन तयार होईल आणि विदर्भ देशाचा लॉजिस्टिक्स केंद्र म्हणून स्थान मिळवेल, असे राऊत यांनी पत्रात म्हटले आहे.

शक्तिपीठमुळे शेतकऱ्यांच्या विशेषतः पश्चिम महाराष्ट्रातील सुपीक जमीन अधिग्रहित केल्या जातील. त्यामुळे त्या भागातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल.



तसेच या भागातील नैसर्गिक संतुलन बिघडले, असा दावा करत स्थानिक नागरिक तसेच काँग्रेस पक्षाने शक्तिपीठला विरोध केला आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी नागपूर - गोवा शक्तिपीठ मार्ग विदर्भातील आणि मध्य भारतातील खनिज संपत्ती अदानी यांच्या पोर्टपर्यंत पोहोचवण्यासाठीच तयार करण्याचा डाव आहे, असा आरोप केला आहे. परंतु राऊत यांनी शक्तिपीठचे समर्थन केले आहे.

विदर्भाला कृषी, खनिज, पर्यटन आणि सांस्कृतिक वारसा लाभला आहे. त्यामुळे उपलब्ध संसाधनांचा योग्य आर्थिक विकास या संकल्पनेतून साधता येता येणार आहे. हा सुवर्ण त्रिकोण झाल्यास १ लाख कोटींहून अधिकची गुंतवणूक विदर्भात आणता येणार आहे. पाच लाखांहून अधिक रोजगारनिर्मिती शक्य होणार आहे. विदर्भातील कापूस, संत्री, खनिज निर्यातीला गोव्याच्या बंदरामार्गे जागतिक बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. त्याचबरोबर मिहान सेझ व ड्राय पोर्टमुळे नागपूरला देशातील सर्वात मोठे अंतर्गत कार्गो हब बनण्याची संधी मिळू शकेल. इतकेच नव्हे तर शेतकऱ्यांच्या उत्पादनांना प्रक्रिया उद्योगांच्या माध्यमातून नवी बाजारपेठ उपलब्ध होणार आहे. या सर्व बाबींचे महत्त्व लक्षात घेता राज्य सरकारने केंद्राशी समन्वयातून दिल्ली-नागपूर-हैदराबाद औद्योगिक कॉरिडॉर निर्माण करावा. तसेच विदर्भ-गोवा शक्तिपीठ महामार्गाला राष्ट्रीय महत्त्वाचा प्रकल्पाचा दर्जा द्यावा. मिहान व ड्रायपोर्टच्या एकात्मिक विकासासाठी जमीन व अनुदान द्यावे, अशी मागणी राऊत यांनी मुख्यमंत्र्यांना पाठवलेल्या पत्रात केली आहे.

## ठाणे ते मुंबई सीएटी सर्व लोकल सेवा आणि ट्रेन रद्द, स्थानकांवर प्रवाशांची गर्दी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

मुंबईतील मुसळधार पावसाचा फटका लोकल सेवेला बसला असून ठाणे कडून मुंबई सीएसटीकडे जाणाऱ्या सर्व ट्रेन रद्द करण्यात आल्या आहेत. रेल्वे सेवा सुरळीत करण्यात आल्यावर प्रशासनाकडून पुढील सूचना देण्यात येतील. मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनसकडे जाणारी लोकल सेवा ठप्प झाल्यामुळे फलाटावर मोठ्या प्रमाणात प्रवाशांची गर्दी असल्याचे पहायला मिळत आहे. फलाटावर या संदर्भात रेल्वेप्रशासनाकडून सूचना करण्यात येत आहे.

मुंबईत पडतत असलेल्या मुसळधार पावसामुळे अनेक ठिकाणी रेल्वे ट्रॅकवर पाणी साचलं आहे. त्यामुळे सकाळपासूनच रेल्वे सेवा ठप्प झाल्या आहेत. अप मार्गाने येणाऱ्या गाड्या या ठाण्यापर्यंतच सुरू आहेत. ठाणे ते मुंबई सीएसटीकडे जाणाऱ्या गाड्या या रद्द करण्यात आल्याचं सर्व स्टेशन्सवर अनाउंसमेंट केली जात आहे.

संपादकीय ......

# आयोगाचे प्रति-आव्हान

निवडणूक म्हणजे लोकशाहीचा सर्वात मोठा सोहळा, असे म्हटले जाते. भारतासारख्या खंडप्राय देशात ही प्रक्रिया सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाकडे सोपवली आहे. राज्यघटनेच्या कलम ३२४-अ नुसार, २५ जानेवारी १९५० रोजी या आयोगाची स्थापना झाली. निवडणुकांचे वेळापत्रक तयार करणे, उमेदवारांच्या अर्जांची छाननी, मतदानाच्या दिवशीचे नियोजन आणि निकाल जाहीर करण्यापर्यंत सर्व जबाबदार्या आयोगाच्या. निकषांनुसार राजकीय पक्षांना मान्यता देणे, नियमभंग झाल्यास मान्यता रद्द करणे, राजकीय पक्षांना चिन्हवाटप आणि याबाबतच्या तंट्यांचे निवारण, ही कामेही आयोगच करतो. सुकुमार सेन देशाचे पहिले निवडणूक आयुक्त, तर एस. रमादेवी हे पद सांभाळणार्या पहिल्या महिला. देशाचे मुख्य निवडणूक आयुक्त म्हणून टी. एन. शेषन यांची कामगिरी खूप गाजली. त्यांची तेजस्वी परंपरा त्यानंतरच्या काळात कायम राहिली का, याचा शोध घेणेही गरजेचे. भारतासारख्या विशाल देशात निवडणुका सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी वर्षानुवर्षे आयोग पार पाडतो. या निवडणूक प्रक्रियेचा जगभर आदराने गौरव केला जातो. आयोगाबद्दल यापूर्वीही अनेकवेळा तक्रारी झाल्या, तरीही त्यावर टीका करताना संयम व विवेक बाळगण्याची गरज आहे. कारण, शेवटी आयोग ही एक स्वायत्त, घटनात्मक संस्था असून, त्यावर सरसकटपणे आणि निराधार आरोप करणे योग्य नव्हे. मध्यंतरी लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी आयोगावर आरोप केले होते. कर्नाटकात लोकसभा निवडणुकीत एका मतदारसंघात मतचोरी झाल्याचा आरोप त्यांनी केला. बनावट मतदार, खोटे आणि अवैध पत्ते असलेले मतदार, एकाच पत्त्यावर भरमसाट मतदारांची नोंद, अवैध फोटो आणि फॉर्म, सहीचा गैरवापर करणारे मतदार, अशा माध्यमांतून मतचोरी होत असल्याचा आरोप राहुल यांनी केला होता.तत्पूर्वी, महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीच्या वेळी अचानकपणे मतदारसंख्या वाढल्याबद्दल त्यांनी गंभीर आरोप केले होते. आता आयोगावर आरोप करणार्या राहुल गांधी यांनी माफी मागावी किंवा पाच दिवसांच्या आत या आरोपांसोबत स्वाक्षरी केलेले प्रतिज्ञापत्र सादर करावे. तसे न केल्यास, हे सर्व आरोप निराधार असल्याचे मानून फेटाळून लावले जातील, असा इशारा मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी दिला आहे. बिहारमधील मतदारयाद्यांच्या विशेष सखोल पडताळणीबाबतही (एसआयआर) राहुल यांनी आक्षेप घेतले असून, त्यालाही आयोगाने उत्तर दिले. मतदारयाद्यांमधील त्रुटी दूर करण्यासाठीची ही मोहीम असून, काही पक्ष त्याबाबत चुकीची माहिती पसरवत आहेत, दुहेरी मतदान आणि मतचोरीचे आरोप तथ्यहीन असून, आयोगापुढे सर्व राजकीय पक्ष समान असल्याचा खुलासा ज्ञानेश कुमार यांनी केला आहे. अर्थात, बिहारमधील 'एसआयआर'बाबत केवळ काँग्रेसनेच नव्हे, तर अन्य पक्षांनीही आक्षेप घेतले. लोकसभेत या प्रश्नावर चर्चा करण्याची मागणी सर्व विरोधी पक्षांनी लावून धरली आणि आयोगावर मोर्चाही नेला.

आयोग केंद्र सरकारसाठी काम करत असल्याचा विरोधकांचा आरोप आहे. अर्थात, हा आरोप मोघम स्वरूपाचा असून, काँग्रेसच्या काळात भाजपही अशाप्रकारचा आरोप करत असे. मतदारयाद्यांतील सर्व त्रुटी दूर करणे हा 'एसआयआर'चा (मतदारयाद्या पुनरीक्षण) खरा उद्देश आहे; पण याबाबतच्या सर्वच तक्रारी खोट्या म्हणता येणार नाहीत. शिवाय, हे प्रकरण सध्या सर्वोच्च न्यायालयात असून, सुनावणीच्या वेळी न्यायाधीशांनी काही गोष्टींबाबत आयोगाचे कानही टोचले. 'एसआयआर'मध्ये बिहारच्या प्रारूप मतदारयादीतून वगळलेल्या नावांची यादी सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर जिल्हा दंडाधिकार्यांच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध झाली. न्यायालयाच्या आदेशानंतरच आयोगाने ही गोष्ट अंमलात आणली, हे लक्षात घेतले पाहिजे. मात्र, कर्नाटकमध्ये लोकसभा निवडणुकीत एका मतदारसंघात मतचोरी कशी झाली, याचा जो पुरावा राहुल यांनी सादर केला, त्याला यथायोग्य उत्तर आयोगाने दिलेले नाही. शिवाय, राहुल गांधी यांची पत्रकार परिषद संपत असतानाच, आयोगाने त्यांना पत्र पाठवून, केलेले आरोप सिद्ध करावेत, असा आदेश काढला. यापूर्वी इतक्या तातडीने कधीही अशाप्रकारचे प्रति-आव्हान कोणालाही दिले नसावे! मात्र, मी राजकारणी असून, माझा जाहीर शब्द हीच शपथ आहे, असे प्रत्युत्तर देऊन, राहुल यांनी आयोगास आपण जुमानत नसल्याचे दाखवून दिले. एवढेच नव्हे, तर हा आरोप खोटा असल्याचे आयोगानेच सिद्ध करावे, अशी भूमिका काँग्रेसने घेतली. म्हणूनच याबाबतचे पटण्याजोगे स्पष्टीकरण आयोगाने दिल्यास, मतदारांच्या मनातील संशय दूर होईल.आयोगाच्या मदतीने निवडणूक घोटाळे झाले असून, या मतचोरांना केंद्र आणि बिहारच्या सत्तेतून खाली खेचा, असे आवाहन बिहारमधील 'महागठबंधन'च्या नेत्यांनी या पार्श्वभूमीवर केले. राहुल गांधी यांनी बिहारमध्ये 'व्होटर अधिकार यात्रे'ला सुरुवात केली असून, त्यांनी या प्रश्नाचे उघडपणे राजकारण करण्यास सुरुवात केली आहे. भाजपचे खासदार अनुराग ठाकूर यांनीही पत्रकार परिषद घेऊन रायबरेली, कनौज, मैनपुरी, डायमंड हार्बर, कोलाथूर आणि वायनाड या मतदारसंघांत लोकसभा निवडणुकीच्या वेळी घोळ झाल्याचा आरोप केला. त्यामुळे तेथून निवडून आलेल्या नेत्यांनी राजीनामा द्यावा, अशी त्यांची मागणी आहे.एकप्रकारे आयोगावर त्यांनीही आक्षेपच घेतले असून, त्याबाबत ठाकूर यांनीही कोणते ठोस पुरावे सादर केलेले नाहीत. राहुल यांना आयोगाने दिलेले आव्हान त्याअर्थाने त्यांनाही लागू पडते. मात्र, दोन्ही आघाड्यांवर याबाबत सुरू असलेले राजकारण आणखीनच भडकणार, हे स्पष्ट आहे. बिहार, पश्चिम बंगाल, आसाम आणि केरळात विधानसभा निवडणुका तोंडावर आहेत. साहजिकच, या निवडणुकांमध्ये मतचोरीचा आरोप होण्याची शक्यता आहे. म्हणूनच आयोगाने मतदारयाद्यांबाबत कोणत्याही शंका राहू नयेत, याची दक्षता घेतली पाहिजे. या प्रक्रियेवर बारकाईने लक्ष ठेवण्याची जबाबदारी राजकीय पक्षांची आहे. निकालानंतर तक्रारी करण्यात अर्थ नाही. आयोगाची विश्वासार्हता अबाधित राहणे, हे लोकशाहीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. आयोगाचा कारभार हा राजकारणाचा विषय होऊ नये, याची काळजी सर्व संबंधितांनी घेतली पाहिजे.

# कृषी यंत्र आणि तुषार/ठिबकसाठी निवड झालेल्या शेतकऱ्यांनी 'ही' कागदपत्रे अपलोड करा

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक-** महाडीबीटी पोर्टलद्वारे कृषि यांत्रिकीकरण अंतर्गत कृषी यंत्र आणि तुषार/ठिबक सिंचन योजनेची सोडत काढण्यात आली आहे. तसेच ज्या शेतकऱ्यांची या सडतीद्वारे निवड करण्यात आलेली आहे. अशा शेतकऱ्यांना कागदपत्रे अपलोड करण्याचे आवाहन केले आहे. नेमकी कोणती कागदपत्रे आवश्यक आहेत, ते पाहुयात...




कृषि यंत्र साठी निवड झाल्यानंतर अपलोड करावयाची कागदपत्रे

विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

### अनिवार्य कागदपत्रे

यंत्राचे कोटेशन

यंत्राचा टेस्ट रीपोर्ट

ट्रॅक्टर ठउ (ट्रॅक्टर चलित यंत्रांकरिता)

बँक पासबूक

आवश्यक असेल तर

वैध जात प्रमाणपत्र

संयुक्त खातेदार असल्यास संमतीपत्र

शॉप डीलरशिप प्रमाणपत्र (अधिकृत विक्रेता असलेबाबत)

तुषार/ठिबक साठी निवड झाल्यानंतर अपलोड करावयाची कागदपत्रे

### अनिवार्य कागदपत्रे

हमीपत्र (परिशिष्ट ७)

सूक्ष्म सिंचन दरपत्रक (कोटेशन)

बँक पासबूक

आवश्यक असेल तर

संयुक्त खातेदार असल्यास संमतीपत्र

वैध जात प्रमाणपत्र

सिंचन स्रोत स्वयंघोषणापत्र

तसेच ७/१२ उतारा, ८अ उतारा व आधार हे कागदपत्र अपलोड करण्याची आवश्यता नाही. -


शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०





# कोलेस्टेरॉलची समस्या असणाऱ्यांनी कोणते दूध प्यावे?

**दि.१९विदर्भ प्रजासत्ताक**

आपल्या रोजच्या आहारात दूध एक महत्त्वाचा घटक असतो. कॅल्शियम, ड जीवनसत्त्व आणि प्रथिने यांचे उत्तम स्रोत असूनही कोलेस्टरॉलच्या निकषावर दूध प्यावे की नाही, असा प्रश्न अनेकांना पडतो. याचे उत्तर थेट 'हो' किंवा 'नाही' असे न देता, दुधाचा प्रकार आणि त्यातील चरबीचे प्रमाण लक्षात घेणे महत्त्वाचे ठरते.



संपूर्ण किंवा फुलफॅट दूध म्हणजे पूर्ण चरबी असलेले दूध. यात संतृप्त चरबी (सॅच्युरेटेड फॅट्स) जास्त प्रमाणात असते. ही संतृप्त चरबी शरीरातील 'एलडीएल' म्हणजेच वाईट कोलेस्टेरॉल वाढवते आणि त्यामुळे हृदयविकाराचा धोका वाढू शकतो. एक कप फुलफॅट दुधात सुमारे २४ ते ३५ मिलिग्रॅम कोलेस्टेरॉल असते. त्यामुळे ज्यांचे कोलेस्टेरॉल आधीपासूनच जास्त आहे, अशा व्यक्तींनी असे दूध मर्यादित प्रमाणातच प्यावे.

लो फॅट किंवा स्किम दूध (चरबीविरहित) : यामध्ये संतृप्त चरबी आणि कोलेस्टेरॉल दोन्हीचे प्रमाण फारच कमी असते. एक कप स्किम दुधात फक्त ५ मिलिग्रॅम कोलेस्टेरॉल असते. त्यामुळे हृदयाचे आरोग्य जपण्यासाठी आणि कोलेस्टेरॉल नियंत्रणात ठेवण्यासाठी हा एक चांगला पर्याय ठरतो.

बाजारात मिळणारे आल्मंड मिल्क, सोया दूध आणि ओट्स दूध हे पर्याय कोलेस्टेरॉलमुक्त असल्याचा दावा केला जातो; परंतु त्यांच्या निर्मितीतील अनेक प्रक्रिया या नव्या समस्या उद्भवणार्या असू शकतात. आजकाल बाजारात ओमेगा-३ फॅटी ॲसिडस् किंवा प्लांट स्टेरोल्स मिसळलेले दूधदेखील मिळते. हे हृदयासाठी अधिक फायदेशीर असल्याचा दावा केला जातो.

या सर्वांपेक्षा देशी गायीचे दूध हा सर्वांत उत्तम पर्याय ठरतो. कोलेस्टेरॉल, चरबी यांसारख्या आधुनिक काळात भीती बनून राहिलेल्या गोष्टींच्या पार्श्वभूमीवर रोज एक ग्लास देशी गायीचे दूध प्राशन करावे. यामध्ये साखर, पावडरी काहीही न मिसळता हे दूध प्यावे. बदलत्या जीवनशैलीमुळे शरारीची होणारी झीज भरून काढण्यासाठी हे दूध उपरोक्त सर्व पर्यायांपेक्षा लाभदायक ठरते. याखेरीज भरपूर व्यायाम करणार्यांनी, शारीरिक कष्टाची कामे करणार्यांनी, वाढत्या वयातील मुलामुलींनी म्हशीचे ताजे दूध प्यायल्यास त्यातूनही बर्याच प्रमाणात पोषक द्रव्ये शरीराला मिळतात.

अरे कहना क्या चाहते हो.. डायलॉगफेम फेम

# ज्येष्ठ अभिनेते अच्युत पोतदार काळाच्या पडद्याआड

## वयाच्या ९०व्या वर्षी त्यांनी घेतला अखेरचा श्वास

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९ ठाणे:** मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील ज्येष्ठ अभिनेते अच्युत पोतदार यांचं सोमवारी रात्री १० वाजून १० मिनिटांनी ठाण्यातील ज्युपिटर हॉस्पिटलमध्ये निधन झाले. वयाच्या ९०व्या वर्षी त्यांनी अखेरचा श्वास घेतला. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीने एक बहुआयामी कलाकार गमावला आहे. अच्युत पोतदार यांनी आपल्या अभिनयाने आणि साध्या-सोप्या राहणीमानानं प्रेक्षकांच्या मनात स्थान निर्माण केले होते. अच्युत पोतदार यांचा जन्म २२ ऑगस्ट १९३४ रोजी मध्य प्रदेशातील जबलपूर येथे एका मराठी कुटुंबात झाला. त्यांचे बालपण इंदूर येथे गेले. १९६१ मध्ये त्यांनी अर्थशास्त्रात पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. शिक्षणानंतर त्यांनी मध्य प्रदेशातील रीवा येथे प्राध्यापक म्हणून काम केले. १९६२ ते १९६७ या काळात भारतीय सैन्यात कॅप्टन म्हणून सेवा बजावली. त्यानंतर त्यांनी इंडियन ऑइलमध्ये २५ वर्षे कार्यकारी अधिकारी म्हणून काम केले आणि १९९२ मध्ये वयाच्या ५८व्या वर्षी निवृत्त झाले. अच्युत पोतदार यांनी वयाच्या ४४व्या वर्षी १९८० मध्ये चित्रपटसृष्टीत पदार्पण केले. एक छंद म्हणून त्यांनी अभिनय क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. त्यांना ज्या भूमिका मिळाल्या त्या त्यांनी पूर्ण समर्पणाने साकारल्या. त्यांनी १२५ हून अधिक हिंदी चित्रपटांमध्ये काम केले, तसेच मराठी चित्रपट आणि नाटकांमध्येही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे. याशिवाय त्यांनी ९५ टेलिव्हिजन मालिका, २६ नाटके आणि ४५ जाहिरातींमध्ये काम केले. त्यांच्या उल्लेखनीय हिंदी चित्रपटांमध्ये अर्ध सत्य (१९८३), परिंदा (१९८९), रंगीला (१९९५), दामिनी (१९९३), ३ इडियट्स (२००९), फरारी की सवारी (२०१२) आणि दबंग २ (२०१२) यांचा समावेश आहे. मराठी चित्रपटांमध्ये त्यांनी नवरी मिळे नवर्याला (१९८४) आणि ये रे ये रे पैसा (२०१८) यांसारख्या चित्रपटांमध्ये आपल्या अभिनयाची छाप पाडली. विशेषतः दिग्दर्शक विधु विनोद चोप्रा यांच्या चित्रपटांमध्ये त्यांचा नेहमीच समावेश असे. त्यांनी अनेकदा वडील, प्राध्यापक, किंवा गंभीर व्यक्तिरेखा साकारल्या, ज्यामुळे त्यांना प्रेक्षकांमध्ये विशेष ओळख मिळाली.



टेलिव्हिजनवरही त्यांनी प्रधानमंत्री (एबीपी न्यूज), आंदोलन (आज तक), अमिता का अमित (सोनी) आणि माझा होशील ना (झी मराठी) यांसारख्या मालिकांमध्ये महत्त्वपूर्ण भूमिका साकारल्या. त्यांच्या माझा होशील ना या मालिकेतील 'अप्पा' ही भूमिका प्रेक्षकांमध्ये विशेष लोकप्रिय ठरली. अच्युत पोतदार यांच्या अभिनय कारकिर्दीला अनेक पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले. १६ ऑगस्ट २०१५ रोजी इंदूर येथील सानंद या सांस्कृतिक गटाने त्यांना लाइफटाइम अचिव्हमेंट पुरस्कार प्रदान केला. तसेच २०२१ मध्ये झी मराठी जीवन गौरव पुरस्कार त्यांना माझा होशील ना या मालिकेतील 'अप्पा' या भूमिकेसाठी मिळाला. त्यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीने एक कसलेला अभिनेता आणि प्रेरणादायी व्यक्तिमत्व गमावले आहे.

# रविवारी वंदे भारत दोन तास एकाच जागी थांबून

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९मूर्तिजापूर-** वंदे भारत' एक्स्प्रेस नियोजित वेळेवर धावण्यासाठी प्रसिद्ध आहे. परंतु, रविवारी पुण्याकडे येणाऱ्या अप लाइनवर मालगाडीचा खोळंबा झाल्याने मूर्तिजापूर स्थानकावर वंदे भारत दोन तास थांबविण्यात आली. त्यामुळे नागपूर-पुणे वंदे भारत रविवारी ९ वाजून ५० मिनिटांऐवजी रात्री ११ वाजून ३० मिनिटांनी पुण्यात पोहोचली. नियोजित वेळेपेक्षा पावणेदोन तास उशीर झाला.

एका आठवड्यापूर्वी पुणे ते नागपूर वंदे भारत एक्स्प्रेस सुरू झाली आहे. यामुळे विदर्भ आणि पश्चिम महाराष्ट्रातील प्रवास सोयीचा झाला आहे. ही एक्स्प्रेस नागपूरवरून सकाळी ९ वाजून ५० मिनिटांनी निघते. पुण्यात रात्री ९ वाजून ५० मिनिटांनी पोहचते. १२ तासांत वंदे भारत हे अंतर पूर्ण करते. इतर एक्स्प्रेस



गाड्या नागपूरवरून पुण्याला पोहचण्यासाठी १५ ते १६ तासांचा वेळ घेतात. यामुळे या गाडीला प्रवाशांकडून चांगला प्रतिसाद मिळत आहे. रविवारी नागपूरवरून नियोजित वेळेत वंदे भारत निघाली, परंतु अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर स्थानकाजवळ मालगाडी खोळंबली होती. त्यामुळे वंदे भारत दोन तास एकाच जागी थांबून होती. यामुळे प्रवाशांना दोन तास ताटकळत थांबावे लागले. त्यामुळे पुढील स्थानकावर पोहचण्यासाठी वंदे भारतला उशीर झाला.

# जिल्ह्यात संत्रा बागांवर आंबिया बहाराच्या फळगळतीचे संकट

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१९अमरावती : -** आंबिया बहाराच्या संत्र्याची मोठ्या प्रमाणावर गळती सुरू असल्यामुळे संत्री उत्पादकांसमोर मोठे संकट उभे ठाकले आहे. वातावरणात अचानक झालेल्या बदलामुळे किडींचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे सर्वत्र फळगळती सुरु आहे, तर कुठे कोळशी मोठ्या प्रमाणात पसरल्याने संत्रा फळांना काळे लालसर डाग पडत आहेत. बाग ताणावर असताना पडणाऱ्या पावसामुळे फळगळती सुरू होते आणि उत्पादकता प्रभावित होते.

राज्यात सुमारे दीड लाख हेक्टर क्षेत्रावर संत्र्याची लागवड आहे. त्यातील सर्वाधिक ७० हजार हेक्टर क्षेत्र एकट्या अमरावती जिल्ह्यात आहे. त्यानंतर नागपूर आणि उर्वरित राज्यात क्षेत्र आहे. फवारणी केल्याने कोळशी कमी होईल, असे तज्ज्ञांनी सांगितले होते. परंतु तसे केल्यानंतरही कोळशी कमी झालेली नाही. संत्र्याच्या झाडांची पाने पिवळी पडून झाडे वाळत आहेत. झाडावरच फळे पिवळी झालेली दिसत आहे. तरीदेखील शेतकरी कृषी सेवा केंद्रामध्ये जाऊन महागडी औषधी खरेदी करत आहेत. फायटोप्थोरा बुरशी समस्या वाढत असल्याने संत्र्याची गळतीही वाढत चालली आहे.

सध्या वातावरणात मोठे बदल होत आहेत. काही भागात अतिवृष्टी आणि काही भागात दुपारी अचानक तापमानात वाढ अशा विविध कारणांमुळे आंबिया बहरातील फळांची संत्रा फळगळ होत आहे.



बुरशीच्या वाढत्या प्रादुर्भावामुळे देखील फळगळ होत आहे. शेतात वराह, वन्य प्राणी मोठ्या प्रमाणावर फळांचे नुकसान करत आहेत. संत्र्यावर संशोधन करण्यासाठी संस्था, स्वतंत्र विभाग कार्यरत असतानाही संबंधितांकडून शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचे मार्गदर्शन होताना दिसत नाही. तशी ओरड शेतकरी करीत आहे. दुसरीकडे शेतकऱ्यांकडे सध्या शेतीची बरीच कामे असल्याने शेतकरी वेळ देऊ शकत नाही, असे कृषी तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

केंद्र सरकारने खते, कीटकनाशके, तणनाशके, त्यावर लादलेला जीएसटी यामुळे संत्रा उत्पादक शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे. पेट्रोल डिझेलवर लादलेला अतिरिक्त कर यामुळे शेतकरी हतबल झाला आहे. शेतमालाला भाव नसल्याने शेतकरी कर्जबाजारी झाला आहे. संत्रा फळगळतीचे पंचनामे लवकर करुन अनुदान वितरित करावे, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.


आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

Scan this QR code using the WhatsApp camera to join this group

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

मंगळवार दि. १९ ऑगस्ट २०२५

शहर/ग्रामिण


## प्रशासनाची निवडणूक प्रक्रिया तयारी जोरात

# नगर परिषद, नगरपंचायत प्रारुप प्रभागरचना प्रसिद्ध

### १० नगरपरिषदांकरिता ३१ ऑगस्टपर्यंत मुदत

### २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–** स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीची तयारी प्रशासकीय स्तरावर जोरात सुरु आहे. सोमवार १८ ऑगस्ट रोजी नगरपरिषद, नगरपंचायतीची प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली. त्यानंतर आता यावर हरकतीव आक्षेपस्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. धारणी, नांदगाव खंडेश्वर नगरपंचायतीकरिता २१ ऑगस्टपर्यंत तर १० नगरपरिषदा साठी ३१ ऑगस्टपर्यंत आक्षेपांकरिता मुदत देण्यात आली आहे. २६ ते ३० सप्टेंबर दरम्यान अंतिम प्रभाग रचना प्रसिद्ध केली जाणार आहे.राज्य शासनाने नगरपरिषदांच्या प्रभाग रचनेसाठीचे वेळापत्रक जाहीर केले आहे. आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर प्रभाग रचना प्रक्रिया निश्चित मुदतीत पार पाडण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.वेळापत्रकानुसार ११ जूनपासून कार्यक्रमाला सुरूवात करण्यात आली आहे. ३० जुलै दरम्यान अंतर्गत प्रक्रियाआटोपल्यानंतर सोमवारी प्रारुप प्रभाग रचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. यामध्ये धारणी आणि नांदगाव खंडेश्वर या दोन नगरपंचायतचीला १८ ते २१ ऑगस्ट दरम्यान आक्षेप व हरकती स्वीकारले जाणार असून इतर १० नगरपरिषदांकरिता ३१ ऑगस्ट हरकती स्वीकारले जाणार





आहे. १ सप्टेंबर ते ८ सप्टेंबर दरम्यान जिल्हाधिकारी यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांकडून हरकतींवर सुनावणी घेतली जाईल.९ ते ११ सप्टेंबर दरम्यान सुनावणीवर निर्णय देत प्रभाग रचना अंतिम करून जिल्हाधिकारी यांचेकडे सादर केले जाणार आहे. १२ ते १८ सप्टेंबर दरम्यान सदर प्रभाग रचना निवडणुक आयोगाकडे सादर केल्या जाणार आहे. त्यानंतर राज्य निवडणूक आयोगाने अंतिम प्रभाग रचना मान्य करून २६ सप्टेंबर ते ३० सप्टेंबर २०२४ दरम्यान ती प्रसिद्ध केली जाईल. त्यानंतर निवडणुक प्रक्रियेला सुरूवात होईल.

# चांदूर बाजार मध्ये उद्याला विश्व हिंदू परिषदेची दहीहंडी

### माजी डब्लू डब्लू ई सुपरस्टार द ग्रेट खलीची राहणार प्रमुख उपस्थिती

### भाजपा शहराध्यक्ष टिकू अहिर यांचे आयोजन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९चांदूर बाजार**
चांदूर बाजार मध्ये उद्या बुधवार २० ऑगस्ट रोजी विश्व हिंदू परिषद प्रणित बजरंग दलाच्या वतीने दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे या महोत्सवाचे प्रमुख आकर्षण वर्ल्ड रेसलिंग एंटरटेनमेंट सुपरस्टार द ग्रेट खली यांची विशेष उपस्तिती लाभणार आहे बजरंग दल, श्री हनुमान क्रीडा, संस्कृतिक व व्यायाम मंडळ, धर्मवीर संभाजीराजे आधुनिक व्यायाम शाळा च्या वतीने चांदूर बाजार शहरातील इंदिरा नगर बेलोरा ऑटो स्टॉप परिसरात या दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात येते अचलपूर मतदार संघाचे आमदार प्रवीण तायडे व माजी खासदार नवनीत राणा सुद्धा या दहीहंडी



महोत्सवात हजेरी लावणार असून गोविंदा पथकांनी मोठ्या संखेत सहभाग नोंदवावा असे आवाहण आयोजक माजी नगरसेवक आनंद उर्फ टिकू अहिर यांनी केले आहे प्रमुख आकर्षण वर्ल्ड रेसलिंग एंटरटेनमेंट सुपरस्टार द ग्रेट खली यांचे मूळ नाव दलीप सिंह राणा आहे त्याला रिंग नावाने द ग्रेट खली म्हणून ओळखले जाते तो एक भारतीय वंशाचा अमेरिकन माजी व्यावसायिक कुस्तीपटू प्रमोटर आणि अभिनेता आहे तो डब्लू डब्लू ई मधील त्याच्या कार्यकाळासाठी प्रसिद्ध आहे जिथे तो पहिला भारतीय वंशाचा विश्वविजेता बनला ॲक्रोमेगालीमुळे ७ फूटांपेक्षा जास्त उंची असलेल्या खलीने त्याच्या भव्य उंचीसाठी लक्ष वेधले आणि २००० च्या दशकाच्या मध्यापासून ते २०१० च्या दशकाच्या सुरुवातीच्या काळात तो डब्लू डब्लू ई मध्ये प्रमुखपणे वैशिष्ट्यीकृत झाला आता द ग्रेट खली भारतीय जनता पक्षा मध्ये कार्यरत असून त्याने राजकीय प्रवास सुरु केला आहे अश्यातच चांदूर बाजार येथे विश्व हिंदु परिषद बजरंगदलाच्या दहीहंडी महोत्सवा मध्ये येथे द ग्रेट खली यांची विशेष उपस्तिती राहणार असून द ग्रेट खलीला पाहण्यासाठी नागरिकांची मोठी प्रमाणात गर्दी होणार आहे व गोविंदा पथकांना खली काय मार्गदर्शन करणार यावर सर्वांचे लक्ष लागले आहे सुरक्षेच्या दृष्टीने चांदूर बाजार पोलीस सुद्धा लक्ष देऊन आहेत आणि पोलिसांनचा चोख बंदोबस्त परिसरात राहणार आहे.–

# पत्नी पळविल्याने राडा, दोघांवर कुऱ्हाडीने हल्ला

### सिनबनची घटना

### आरोपीला धारणी पोलिसांकडून अटक

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ धारणी–** भावाची पत्नी पळवून नेल्यामुळे जाब विचारण्यासाठी गेलेल्या २७ वर्षीय तरुणावर आरोपीच्या पित्याने कुऱ्हाडीने हल्ला केला. धारणी हद्दीतील ग्राम सिनबन येथे शनिवारी ही घटना घडली.

यासंदर्भात धारणी पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. आरोपी भेवलसिंग सिलुसिंग चव्हाण याच्या मुलाने भावाची पत्नी पळवून नेल्याचे फिर्यादीत म्हटले आहे. यासंदर्भात जाब विचारण्यासाठी तो व त्याचा भाऊ गेला असता, आरोपी भेवलसिंग चव्हाण याने त्याच्या भावावर कुऱ्हाडीने वार केला. त्याला सोडवण्यासाठी गेला असता * त्याच्यावरही हल्ला केला. १६ ऑगस्टला ८-३० वाजताच्या सुमारास ही घटना घडली. यासंदर्भात धारणी पोलिसांनी आरोपी भेवलसिंगचव्हाण विरुध्द कलम ११८/२-३५२ नुसार गुन्हा दाखल केला असून, त्याला अटक केली आहे.

### सामान्य कार्यकर्त्यांचा असामान्य प्रवास

# भाजप जिल्हा उपाध्यक्षपदी अमित बाभुळकर

### कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९तिवसा–** साधे राहणीमान, मितभाषी स्वभाव, पण लोकांसाठी मोठे हृदय या गुणांमुळे तिवसा तालुक्यातील आणि अमरावती जिल्ह्यातील हजारो लोकांच्या मनात घर करणारे नाव म्हणजे अमित बाभूळक संघर्षातून यशाचा मार्ग तयार करत त्यांनी आता मोठी राजकीय झेप घेतली आहे. नुकतीच त्यांची भारतीय जनता पार्टी अमरावती जिल्हा उपाध्यक्षपदी निवड झाली असून, गावकऱ्यांपासून कार्यकर्त्यांपर्यंत असंख्य लोकांच्या शुभेच्छांचा वर्षाव त्यांच्यावर होत आहे.तिवसा शहरातील एका सर्वसामान्य कुटुंबात जन्मलेले बाभूडकर लहानपणापासूनच संघर्षाशी दोन हात करत आले. घरची आर्थिक परिस्थिती हलकी असल्यामुळे शिक्षणाबरोबरच कष्टाचे महत्त्व त्यांनी लहान वयातच जाणले. त्यातूनच लोकांचे प्रश्न समजून घेणे, त्यांच्या मदतीला धावून जाणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे ही सवय त्यांच्यात रुजली.अमित बाभूळकर यांचा राजकीय प्रवास थेट कार्यकर्ता पदापासून सुरू झालेला नाही. सामाजिक आघाड्यांवर काम करताना त्यांनी अनुभव मिळवला. तिवसा शहर अध्यक्ष म्हणून कार्यरत असताना



#### नवा निर्धार, नवी दिशा

नव्या जबाबदारीनंतर बाभूळकर यांनी पक्षश्रेष्ठींप्रति मन:पूर्वक आभार मानले. त्यांनी सांगितले कीआज मला दिलेली ही जबाबदारी मी अत्यंत जोमाने, वेगाने आणि प्रामाणिकपणे पार पाडणार आहे. गावागावात पोहोचून प्रत्येक कार्यकर्त्याला सोबत घेऊन पक्षाची पकड मजबूत करणार आहे. सामाजिक बांधिलकी, कार्यकर्त्यांशी संवाद आणि जनतेशी नाळ घट्ट ठेवत भाजपाचा झेंडा अमरावती जिल्ह्यात सदैव उंचावू.

गावातील पायाभूत सुविधा, रस्ते, पाणीपुरवठा, शैक्षणिक गरजा याकडे त्यांनी विशेष लक्ष दिले.शहरात तेली समाजाच्या समस्यांवर ठोस पावले, तर विविध कार्यक्रमांतून सामाजिक सलोखा वाढवण्याचे काम त्यांनी केले. तसेच तहसील कार्यालय, मुखेड येथील संजय गांधी निराधार योजनेतून शेकडो गरजू कुटुंबांना लाभ मिळवून देण्यातही मोलाची भूमिका पार पाडली.त्यांच्या संघटन कौशल्य, कार्यकर्त्यांशी सातत्यपूर्ण संवाद, तसेच गरीब, शेतकरी, मजूर आणि तरुणांच्या समस्या सोडवण्याच्या बांधिलकीची दखल घेत भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाने त्यांच्यावर विश्वास दाखवून जिल्हा उपाध्यक्षपदी त्यांची निवड केली.भाजपा उपप्रदेशाध्यक्ष रविराज देशमुख यांचे खंदे समर्थक असलेले बाभूळकरयांना पक्ष संघटनाचा मौल्यवान अनुभव मिळाला आहे.अमित बाभूळकर यांच्या साधेपणामुळे, स्पष्ट बोलण्यामुळे आणि सर्वांना समान वागणूक देण्याच्या वृत्तीमुळे त्यांना जनतेचा प्रचंड पाठिंबा आहे. सामान्य कार्यकर्त्याला जिल्हा उपाध्यक्ष पद देऊन भाजपने विधायक जबाबदारी दिल्याने तालुक्यात तसेच जिल्ह्यात उत्साहाचे वातावरण आहे.

# चांदूर रेलवे स्टेशनवर निर्माण झालेल्या समस्यांचे तत्काळ निराकरण करा

### रेल रोको कृती समितीचे डीआरएम यांना निवेदन

विदर्भ प्रजासत्ताक
**दि.१९चांदूर रेल्वे–** चांदूर रेल्वे स्टेशनची अवस्था फार वाईट झालेली आहे. याकडे वरिष्ठ रेल्वे अधिकारी वर्गाचे दुर्लक्ष होत असुन प्रवाशांचे हाल होत आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या समस्यांचे त्वरीत निराकरण करावे अशी मागणी स्थानिक रेल रोको कृती समितीने स्टेशन प्रबंधक यांच्यामार्फत डीआरएम, नागपुर यांना पाठविलेल्या निवेदनातून केली आहे.चांदूर रेल्वे स्टेशनवर नागपुर – पुणे या रेल्वे गाडीचा थांबा देण्यात यावा अशी मुख्य मागणी करण्यात आली आहे. तर चांदूर रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मवरील सुरक्षा भिंतीचे काम सुरू आहे. मात्र सदर बांधकाम निकृष्ट दर्जाचे



होत आहे. तसेच या बांधकामात जुन्याच विटांचा वापर करण्यात आल्याचे समजते. त्यामुळे या कामाची सखोल चौकशी होऊन चांगल्या दर्जाचे काम करण्यात यावे, रेल्वे स्टेशनवरील एका प्लॅटफॉर्मवरून दुसऱ्या प्लॅटफॉर्मवर जाण्यासाठी असलेल्या ओव्हर रूट फूट ब्रिजची स्थिती अत्यंत धोकादायक आहे. या पुलावरील जुना कॉंक्रीटचा थर काढून २ महिन्यांहून अधिक काळ लोटला आहे. या फूटब्रिजवरून चालतांना प्रवाशांचे हाल होत आहे. त्यामुळे सदर ब्रिजचे काम त्वरीत करण्यात यावे, अनेक दिवसांपासून रेल्वे स्टेशनवर अस्वच्छता पसरलेली आहे. प्लॅटफॉर्मवर अनेक ठिकाणी गवतही वाढलेले दिसून येते. त्यामुळे स्वच्छता कर्मचारी त्वरीत नेमण्यात यावे, स्वच्छता गृहात पाण्याची व्यवस्था नसुन तेथे सुध्दा घाणीचे साम्राज्य निर्माण झाले आहे. तसेच तेथे लाईट सुध्दा नसुन यामुळे महिलांची गैरसोय होत आहे, रेल्वे प्लेटफॉर्म वर रेल्वे गाडीच्या कोचच्या माहितीसाठी कोच इंडिकेटर ची व्यवस्था करण्यात यावी जेणेकरून प्रवाशांची ट्रेन आल्यावर पळापळ होणार नाही, दोन्ही प्लॅटफॉर्मवर पुरेशी लाईट व्यवस्था नसल्याने रात्री अंधार असतो. त्यामुळे आणखी लाईट दोन्ही प्लॅटफॉर्मवर लावण्यात यावे या समस्या निवेदनातून रेल्वे विभागाकडे मांडण्यात आल्या. सदर सर्व समस्या येत्या १५ दिवसांत सोडविण्यात याव्या अन्यथा आंदोलनाची भुमिका घेण्याचा इशाराही निवेदनातून देण्यात आला आहे. निवेदन देतेवेळी रेल रोको कृती समितीचे अध्यक्ष नितीन गवळी, सदस्य मेहमुद हुसैन, विनोद जोशी, राजाभाऊ भैसे, बंडूभाऊ यादव, हर्षल वाघ, प्रा. प्रसेन्नजित तेलंग, भुषण नाचवणकर, विनोद लहाणे, महादेव शेंद्रे, भिमराव खलाटे यांसह अनेकांची उपस्थिती होती. निवेदनाच्या प्रति खासदार अमर काळे, आमदार प्रताप अडसड यांना पाठविण्यात येणार आहे.


#### प्लॅटफॉर्मची उंची वाढवावी

चांदूर रेल्वे स्टेशनच्या प्लॅटफॉर्मची उंची लहान असुन ट्रेनच्या बोगीच्या पार्यऱ्या थोड्या उंचीवर जातात. त्यामुळे महिला, वृध्दांना ट्रेनमध्ये चढतेवेळी त्रास होतो. त्यामुळे अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही. तरी सदर प्लॅटफॉर्मची उंची वाढविण्यात यावी.– **नितीन गवळी**
अध्यक्ष, रेल रोको कृती समिती, चांदूर रेल्वे–

# खोलीकरण-भिंत रखडली, गावकऱ्यांची झोप उडाली

### नाल्याच्या काठावरील घरांना पूराचा धोका; ग्रामस्थांचा संताप

**विदर्भ प्रजासत्ताकदि.१९चांदूरबाजार** १३माधान गावातील नाल्याच्या काठावर असणाऱ्या घरांना पावसाळ्यात गंभीर धोका निर्माण होत असून मुसळधार पाऊस व नाल्याला आलेल्या पुरामुळे नागरिकांना रात्रभर भीतीपोटी डोळा न लागता काढावी लागत आहे. नाल्याचे खोलीकरण व संरक्षणभिंतीचे काम अद्यापही रखडले असल्याने ग्रामस्थांमध्ये शासनाविषयी तीव्र असंतोष व्यक्त होत आहे.माधान ग्रामपंचायत हद्दीतील माधान, अलीपूर, शिवाजीनगर परिसरात मिळून सुमारे १२० घरे या नाल्यालगत वसलेली आहेत. गावाच्या



मध्यभागातून जाणाऱ्या या नाल्यात दोन लहान नाल्यांचा संगम होतो. नाला अरुंद व उथळ असल्याने पावसाळ्यात बऱ्याचदा पुरस्थिती निर्माण होते. वरून मुसळधार पाऊस व नाल्यात वाढणारे पाणी पाहून नागरिकांना घरात पाणी शिरेल की काय, ही भीती सतावत असते.आतापर्यंत नाल्याचे पाणी माधानमधील २०२ घरांमध्ये, सात किराणा दुकानांत, बुद्ध विहार, प्राथमिक उपकेंद्र व आठ गोठ्यांमध्ये शिरले असून मोठे नुकसान झाले आहे, अशी माहिती तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी यांनी दिली.ग्रामस्थांच्या मते, पूर्वीही नाल्याचे पाणी घरात शिरल्याने नुकसान झाले होते. त्यावेळी प्रशासनाने मदत केली होती. मात्र कायमस्वरूपी उपाय योजला गेला नाही. नाल्याचे खोलीकरण, संरक्षणभिंतीचे बांधकाम व मुख्य रस्त्यावरील पूल उंच केल्यास हा प्रश्न बऱ्याच अंशी सुटू शकतो, असे त्यांनी सांगितले.

# मेळघाटातील ५० खेडी पर्जन्य पावसामुळे अडचणीत

### दळणवळण व वाहतूक व्यवस्था ठप्प

## पंचसरीतांसह नदी ओहळ्यांना पूर, जनजीवन विस्कळीत; आदिवासींवर उपासमारीचे संकट

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९धारणी–** मेळघाटातील पंचतरीतांसह उपनद्यांनी निर्धारित सीमारेषा ओलांडून लांडून पुरसदृश पुरसदृश परिस्थिती परिसि निर्माण केली आहे, गेल्या दोन दिवसांपासून सततधार पावसाचा जोर कायम राहिल्याने धारणी च चिखलदरा या दोन्ही बहुल तालुक्यांतील घनदाट अरण्यात वास्तव्य करणाच्या आदिवासी बांधवांपुढे गंभीर





उपासमारीचे संकट उभे राहण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे. सध्या ५० हुन अधिक गावे मुख्यालय व बाजारपेठेंशी संपर्क तुटल्याने जनजीवन विस्कळीत झाले आहे.

नदीकाठावरील व ओहळयानजीकच्या वस्त्यांमध्ये पुरजन्य परिस्थिती ही अधिक गंभीर बनल्याने महसूल प्रशासनाकडून 'एलो अलर्ट घोषित करण्यात आला आहे. विशेषतः दोन राज्यांची सीमा निर्धारित करणारी सूर्यपुत्री तापी नदीसह डोंगर दऱ्याखोर्यातून पर्जन्य पावसाचा मुबलक साठ्यासह वाहणाऱ्या सीपना, गडगा, खंडु , खापरा व डोलार वा पंचसरीतांनाउफान आले असून, त्यांच्या प्रवाहात राजादेही, डवाल, कुकरी, मेलडोह, कावरा, टिंगच्या, चमारकुंडी यांसारख्या उपनद्यांचे पाणी मिसळल्याने संबंधित नद्या दुथडी भरभरुन वाहत आहेत.

चिखलदरा तालुक्यातील डोंगर पठारावर निसर्गाच्या कुशीत राहणाऱ्या आदिवासींच्या वस्त्यांबर नैसर्गिक अरिष्ट ओढवले आहे. मुसळधार पावसामुळे ओढे-नाले भरून वाहू लागले आहेत. गावागावांत वाहतुकीची साधने बंद पडली असून जीवनावश्यक वस्तूंचा पुरवठा खंडित झाला आहे.धारणी तालुक्यातील राणीगाव, बैरागड, खोपमार, रंगबेली, चौराकुंड, झिलांपाटी, कबडाझरी व्यतिरिक्त चिखलदरा तालुक्यातील भुत्रुम,रुहीपठार, भाडूम अशा गावांवर वाहतुकीचे संकट ओढवले आहे.

परतवाडा आगारातून सुटणाऱ्या एसटी बससेवा पावसाचा जोर पाहता आगार व्यवस्थापकांनी तात्पुरत्या बंद केल्या आहेत, त्यामुळे ग्रामीण भागातील जनतेसाठी प्रवास आणि आपत्कालीन दळणवळण पूर्णतः विस्कळीत झाले आहे. हवामान विभागाने पुढील दोन दिवसांत पावसाचा जोर कायम राहील, असा अंदाज वर्तविला आहे. त्यामुळे मेळघाटातील आदिवासी बांधवापुढील उपासमारीचे संकट टळावे यासाठी प्रशासन व बचाव यंत्रणा सज्ज राहणे अत्यंत आवश्यक असून पूढील अठ्ठेचाळीस तास निर्णायक ठरणार असल्याचे मत स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांमार्फत व्यक्त करण्यात आले आहे.

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीतून, अमरावती विभागातील

# १ हजार १८७ रुग्णांना १०.६१ कोटींची मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती,**

राज्यातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व गरीब रुग्णांसाठी मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्ष हा आधार ठरत आहे. अमरावती विभागात मागील सात महिन्यांमध्ये तब्बल १,१८७ रुग्णांना १० कोटी ६१ लाख ११ हजार रुपयांची वैद्यकीय मदत मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्षातून प्रदान करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सूचनेनुसार पेपरलेस आणि डिजिटल प्रणाली तसेच जिल्हा कक्षांची स्थापना करण्यात आली आहे. त्यामुळे रुग्णांना मंत्रालयात येण्याची गरज भासत नाही. प्रथम रुग्णांनी महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजना, आयुष्मान भारत, राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम किंवा धर्मादाय रुग्णालयांच्या योजनांचा लाभ घ्यावा. जर या योजनांद्वारे उपचार शक्य नसतील, तर मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्षाकडे संलग्न रुग्णालयातून अर्ज करता येतो. यामुळे शासकीय योजनांचा सुयोग्य वापर होतो आणि निधी खऱ्या गरजूंपर्यंत पोहोचतो, अशी माहिती मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाचे प्रमुख रामेश्वर नाईक यांनी दिली.




### या आजारांसाठी मिळते मदत–

कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्षे २ ते ६)
हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो प्रत्यारोपण
कर्करोग (शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन)
रस्ते अपघात
बालकांच्या शस्त्रक्रिया
हिप व गुडघा रिप्लेसमेंट
मेंदूचे आजार, डायलिसिस, अस्थिबंधन
बर्न/विद्युत अपघातग्रस्त रुग्ण
नवजात शिशुंचे आजार इत्यादी २० प्रकारच्या गंभीर आजारांसाठी मदत प्रदान केली जाते.

### आवश्यक कागदपत्रे

रुग्णाचे आधार कार्ड व रेशन कार्ड
रुग्ण दाखल असल्यास जिओ टॅग फोटो (अनिवार्य)
तहसीलदारांचा उत्पन्नाचा दाखला (१.६० लाखांपेक्षा कमी)
वैद्यकीय रिपोर्ट व खर्चाचे प्रमाणपत्र
एफआयआर (अपघातग्रस्तांसाठी)
ZTCC पावती (अवयव प्रत्यारोपणासाठी)
सर्व कागदपत्रे झऊक्र स्वरूपात पुढील ईमेलवर पाठवा: रे.लीष–ह्हर्सी.ळप
अधिक माहितीसाठी टोल फ्री क्रमांक : ९३२१ १०३ १०३ वर संपर्क साधावा.

संपूर्ण राज्यातील गरजू, गरीब रूग्णांना वेळेत मदत पोहचवणे हे कक्षाचे उद्दीष्ट आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्ष सुरू करण्यात आले. त्यामुळे लाभार्थी रूग्णसंख्येत झपाट्याने वाढ होत आहे. कक्षात केलेल्या विविध सकारात्मक बदलांमुळे गरजू रुग्णांपर्यंत वेळेत आणि खऱ्या गरजूंपर्यंत निधी पोहोचत आहे.

रामेश्वर नाईक, कक्ष प्रमुख, मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, महाराष्ट्र.

### अमरावती विभागातील मदतीचा आढावा

१ जानेवारी ते ३१ जुलै २०२५)

| जिल्हा | रुग्णसंख्या | मदत रक्कम |
|---|---|---|
| बुलढाणा | ४४३ | ३,६७,८९,००० |
| अकोला | २६५ | २,३६,४४,००० |
| अमरावती | २३१ | २,२१,४५,००० |
| वाशीम | १३९ | १,३५,८०,००० |
| यवतमाळ | १०९ | ९९,५३,००० |

## मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या पुढाकाराने

# चिमुकल्या देवांशीवर यशस्वी शस्त्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९वाशीम, –**

मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या मदतीतून वाशीम जिल्ह्यातील मंगरुळपीर तालुक्यात राहणाऱ्या सात वर्षीय देवांशी रवींद्र गावंडे हिच्यावर नुकतीच यकृत प्रत्यारोपणाची शस्त्रक्रिया करण्यात आली.ही महागडी शस्त्रक्रिया मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्षाच्या पुढाकाराने पार पडल्याचे समाधान मुलीच्या पालकांनी व्यक्त केले.

रवींद्र गावंडे (रा. वरूड बु.) यांच्या मुलीला जानेवारी २०२५ मध्ये तीव्र पोटदुखीचा त्रास होत होता. मुलीची अकोला आणि त्यानंतर नागपूर येथे वैद्यकीय तपासणी करण्यात आली. तज्ज्ञ डॉक्टरांनी तिचे यकृत गंभीर स्वरूपात बाधित झाल्याचे निदान केले. तसेच तिचे यकृत तातडीने प्रत्यारोपण करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. शस्त्रक्रियेसाठी सुमारे १५ लाख रुपयांचा खर्च सांगण्यात आला.

भाजीपाला विक्री करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या देवांशीच्या वडिलांसमोर एवढी मोठी रक्कम गोळा करण्याचा पेच निर्माण झाला होता. दरम्यान, मुलीच्या वडिलांना मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीबाबत माहिती मिळताच या कक्षाकडे त्यांनी मदत मागितली. याशिवाय सोशल मीडियावर मदतीकरिता आवाहन केले. कक्षाच्या पुढाकाराने देवांशीवर पुढील उपचार मुंबईतील वाडिया हॉस्पिटलमध्ये सुरू झाले. या उपचारासाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष, टाटा ट्रस्ट, सामाजिक संस्था तसेच गावकऱ्यांच्या वर्गणीतून आर्थिक मदत उपलब्ध झाली.

देवांशीला तिची आई मीनाक्षी गावंडे यांनी यकृताचा भाग दिला. त्यातून मुलीवर ७ जुलै २०२५ रोजी यकृत प्रत्यारोपणाची यशस्वी शस्त्रक्रिया पार पडली. आता देवांशीची प्रकृती स्थिर असून तिच्या प्रकृतीत दिवसेंदिवस सुधारणा होत आहे. नुकताच ३ ऑगस्ट रोजी पालकांनी तिचा वाढदिवस साजरा केला. मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी कक्ष आणि टाटा ट्रस्टच्या मदतीमुळेच आपल्या मुलीला पुनर्जीवन मिळाल्याचे समाधान देवांशीच्या पालकांनी व्यक्त केले.मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधीच्या माध्यमातून प्रत्येक गरजू, गरीब रुग्णांना वेळेवर उपचार मिळावेत यासाठी कक्षाच्या माध्यमातून प्रयत्न करण्यात येत आहे. देवांशी त्याचेच एक उदाहरण आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा कक्ष काम करत असून राज्यातील गरीब व गरजू रुग्णांना मदत करण्यासाठी कक्ष तत्पर आहे. या कक्षाचा फायदा सामान्य रुग्णांना मोठ्या प्रमाणावर होत आहे.

# गडचिरोली जिल्ह्यात मुसळधार पावसामुळे जनजीवन विस्कळीत, तरुण वाहून गेला

## पावसामुळे जिल्ह्यातील एकूण ९ मुख्य मार्ग वाहतुकीसाठी बंद

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९गडचिरोली –**

गडचिरोली जिल्ह्यात काल संध्याकाळपासून सुरु असलेल्या मुसळधार पावसाने जनजीवन विस्कळीत झाले असून, अनेक भागांत पाणी साचल्याने नागरिकांची तारांबळ उडाली आहे. गडचिरोली शहरात रात्रभरात तब्बल १७२ मिमी पावसाची नोंद झाली आहे. परिणामी, नदी–नाल्यांची पातळी झपाट्याने वाढली असून, अनेक ठिकाणी पूरस्थिती निर्माण झाली आहे. भामरागड तालुक्यात १९ वर्षीय तरुण नाला ओलांडताना वाहून गेला.




पावसामुळे जिल्ह्यातील एकूण ९ मुख्य मार्ग वाहतुकीसाठी बंद करण्यात आले आहेत. यामध्ये भामरागड, अहेरी, चामोर्शी, मुलचेरा, कुरखेडा आणि देसाईगंज तालुक्यांतील रस्त्यांचा समावेश आहे. पर्लकोटा, वटरा, पोहार, गोमणी आदी नाल्यांमध्ये पाणी पातळी वाढल्याने रस्ते जलमय झाले आहेत.जिल्हा प्रशासनाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे. नद्या व नाल्यांच्या काठावर राहणाऱ्यांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. शाळा आणि महाविद्यालयांना देखील तात्पुरती सुट्टी जाहीर केली जाऊ शकते, अशी माहिती सूत्रांकडून मिळाली आहे.

आपत्ती व्यवस्थापन पथक, महसूल व पोलीस प्रशासनाकडून परिस्थितीवर सतत लक्ष ठेवले जात असून, मदतकार्य सुरू करण्यात आले आहे. पूरस्थितीमुळे शेतीवरील संकट अधिक गडद झाले आहे. पावसाचा जोर कायम राहिल्यास आणखी रस्ते बंद होण्याची शक्यता आहे. नागरिकांनी अनावश्यक प्रवास टाळावा आणि प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

### १९ वर्षीय तरुण गेला वाहून

भामरागड तालुक्यात सुरू असलेल्या पावसामुळे नदी–नाले तुडुंब भरून वाहत आहेत. दरम्यान काल १८ ऑगस्ट रोजी कोडपे गावातील १९ वर्षीय लालचंद कपिलसाय लकडा दुपारी साडेचार वाजताच्या सुमारास खंडी नाला ओलांडताना पुरामध्ये वाहून गेला आहे. प्रशासनातर्फे तरुणाचा शोध घेणे सुरू असल्याची माहिती भामरागडचे तहसीलदार किशोर बागडे यांनी सांगितले आहे.

### वाहतुकीस बंद असलेले प्रमुख मार्ग

हेमलकसा–भामरागड राष्ट्रीय महामार्ग १३० डी (पर्लकोटा नदी), अहेरी–वटरा रस्ता, राज्य महामार्ग ३७० (वटरा नाला), तळोधी–आमगाव–महाल–विसापूर राज्य महामार्ग ३८१ (पोहार नदी), आष्टी–कोपरअली रस्ता, राज्य महामार्ग ३७८, मुलचेरा–गोमणी रस्ता, राज्य महामार्ग ३७० (गोमणी नाला), चौडमपल्ली–चपराळा रस्ता, प्रजिमा ५३ (स्थानिक नाला), काढोली–उराडी रस्ता, प्रजिमा ७ (स्थानिक नाला) शंकरपूर–डोंगरगाव रस्ता, प्रजिमा १, कोकडी–तुलशी रस्ता, प्रजिमा ४९ हे ९ मार्ग बंद आहेत.

# मतदान चोर, खुर्ची सोड!'भाजप व निवडणूक आयोगाला बरखास्त करा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती** शहर जिल्हा कौग्रेस कमिटीतर्फे राजकमल चौक येथे कॅण्डल मार्च काढून बीजेपी सरकारचा निषेध करण्यात आला. यावेळी मतदान चोर खुर्ची सोड, आजादी चाहिये मतदान चोरो से अशा घोषणा देत कॅण्डल मार्च काढून भर पावसात निषेध करण्यात आला. कॉंग्रेस कार्यकर्त्यांच्या घोषणांनी संपूर्ण राजकमल चौक दुमदुमून गेला. पदाधिकाऱ्यांनी सत्ताधाऱ्यांच्या विरोधात घोषणाबाजी करीत मतदान चोरीचा निषेध केला. भर पावसातही कॉंग्रेसच्या या आंदोलनात पदाधिकारी कार्यकर्त्यांसह नागरिक सहभागी झाले होते. यावेळी कॉंग्रेस कार्यकर्त्यांनी हमे आजादी चाहिये .. वोट चोरो से आजादी.. मोदी सरकार से आजादी.. हुकूमशाही से आजादी अशा प्रकारच्या घोषणा देत सरकारचा व निवडणूक आयोगाचा सुद्धा निषेध केला.



### शहर जिल्हा कॉंग्रेसचा राजकमल चौकात कॅण्डल मार्च

या आंदोलनात डॉ. सुनील देशमुख, बबलू शेखावत, विलास इंगोले, मिलिंद चिमोटे, भैया पवार, किशोर बोरकर, विनोद मोदी, जयश्री वानखडे यांच्या सह शेकडो कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'हाथी घोड़ा पालकी जय कन्हैया लाल की'च्या गजराने दुमदुमले इस्कॉन

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती–**

अमरावती इस्कॉन संस्थापक आचार्य श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद बाचे शिष्य लोकनाथ स्वामी महाराज यांच्या प्रेरणेने सरस्वती कॉलनी स्थित श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश अध्यात्यिक संस्कार केंद्र इस्कॉनतर्फे हाथी घोड़ा पालकी जय कन्हैया लाल की... च्या गजरात श्रीकृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव उत्साहात झाला.

या महोत्सवाचे संचालन प्राध्यापक गोविंद यादव प्रभुजी यांनी केले, तर आभार प्रदर्शन श्रीमान श्रीगोविंद प्रभुजी यांनी केले. या उत्सवाचा प्रारंभ ५ ऑगस्टपासून राधा गोविंद झुलन यात्रेने झाला. १६ ऑगस्टला पहाटे ४:३० वाजता श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांच्या शुभमंगल आरतीने सुरुवात झाली. त्यानंतर महामंत्राचा सामूहिक जप झाला. दर्शन आरती आणि श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांची गुरुपूजा झाली. श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश याचे विशेष शृंगार दर्शन हजारो भक्तांनी घेतले. सायंकाळी कृष्णवेश फॅन्सी ड्रेस स्पर्धेने उत्सवाला रंगत आली. देविका साहू यांची राधाकृष्ण प्रस्तुती, मनस्वी धुमनखेडे यांचे राधा कैसे ना जले, पितांबरी भुसारी आणि शैलजा इंगळे यांचे रात सुहानी, भक्त प्रह्लाद स्कूलच्या विद्यार्थ्यांचे करके इशारो बुलाई गयी रे, कृष्णाई आणि मृणमयी वायझाडे यांचे मैया यशोदा, सुहानी मने यांचे कृष्ण भजन, माही पंजवानी यांचे करके इशारो, राधिका आणि कृष्णांगी गाठे यांचे कृष्ण तांडव, भक्त प्रह्लाद स्कूलच्या मुलीच्या चमूचे गोविंदा गोविंदा, अक्षरा मने आणि वैष्णवी गायकवाड यांचे राधे गोविंद कृष्ण मुरारी आणि अस्मिता संगीत निकेतनच्या पंचशृंखला नृत्याने प्रेक्षक मंत्रमुग्ध झाले.

भक्त प्रह्लाद स्कूलच्या कला महोत्सव जन्माष्टमी २०२५ च्या उत्तीर्ण श्री कृष्ण जन्माष्टमी महामहोत्सव उत्साहात साजरा

विद्यार्थ्यांना बक्षीस आणि प्रशस्तिपत्रक वितरण झाले. रात्री ८ वाजता भक्त प्रढ़ाद स्कूलच्या विद्याच्यांनी नाटिका सादर केली. रात्री ९ वाजता श्रीमान पद्मनाभ प्रभू, अनंतशेष प्रभू, अद्वैत आचार्य प्रभू, रणछोड कृष्ण प्रभू, रमाकांत प्रभू, सचिप्राण प्रभू, राम अवतार प्रभू, विठ्ठल प्रभू, सुंदरनाथ प्रभू, गोविंद प्रभू, नित्य हरिनाम प्रभू, वैदर्भी चरण प्रभू, अवतारी गोविंद प्रभू, आचार्य चंद्र प्रभू यांच्या उपस्थितीत श्री श्री रुक्मिणी द्वारकाधीश यांचा महाअभिषेक झाला. अनंतशेष प्रभू यांच्या कृष्ण जन्म कथेने उपस्थित भारावले.मध्यरात्री १२ वाजता हाथी घोड़ा पालकी जय कन्हैया लाल की च्या गजराने श्रीकृष्ण जन्मोत्सव साजरा झाला. १०८ भोग दर्शन आणि महाआरतीनंतर प्रसाद वितरणाने पहिल्या दिवसाची सांगता झाली. १७ ऑगस्टला श्रील भक्तिवेदांत स्वामी प्रभुपाद यांच्या १२९ व्या व्यासपूजेनिमित्त अनंतशेष प्रभू यांनी कथामृत सादर केले. वैष्णव भजन, हरिनाम संकीर्तन आणि महाअभिषेक झाला. दुपारी श्रीगोविंद प्रभू यांच्या हस्ते महाआरती आणि महाप्रसाद वितरणाने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अमरावती विद्यापीठाच्या रस्त्यांसाठी कुलगुरूंची धडपड

## खासदार वानखडेंकडे नऊ कोटींची मागणी; टप्प्याटप्प्याने निधी देण्याचे आश्वासन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१९अमरावती**

अमरावती येथील संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील रस्त्यांची स्थिती काहीशी दयनीय झाली आहे. त्या रस्त्यांच्या दुरुस्तीसाठी विद्यापीठाकडे निधी नसल्यामुळे त्यांनी खासदार बळवंतराव वानखडे यांना साकडे घातले असून त्यासाठी निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी केली आहे.

विद्यापीठ परिसरातील नऊ रस्त्यांची दुरुस्ती अत्यावश्यक झाली आहे. एका रस्त्याच्या दुरुस्तीवर साधारणत: एक कोटी रुपये खर्च येईल, असा आराखडा या क्षेत्रातील तज्ज्ञांनी तयार केला आहे. त्यामुळे नऊ रस्त्यांसाठी नऊ कोटी रुपये द्यावे, अशी विद्यापीठ प्रशासनाची मागणी आहे. खासदारांनीही या मागणीबाबत सकारात्मकता दर्शविली असून कुलगुरुंची तळमळ लक्षात घेता टप्प्याटप्प्याने निधी दिला जाईल, असे भरीव आश्वासन दिले आहे. विद्यापीठाचा एकूण परिसर सुमारे पाचशे एकर जागेत विस्तारलेला आहे. चांगले निसर्ग सौंदर्य आणि चहूबाजूंनी हिरवागार असलेल्या या परिसरात नागरिक रोज सकाळ–सायंकाळच्या भटकंतीसाठी येत असतात. त्यामुळे रस्ते चांगले असणे गरजेचे आहे, हेही यावेळी खासदारांना पटवून देण्यात आले.

विद्यापीठाकडे उत्पनाची साधने अगदी तोकडी आहेत. विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कातून जमा होणारी रक्कम हा विद्यापीठाच्या उत्पन्नाचा सर्वात मोठा स्रोत आहे. विद्यापीठाला कोणताही अधिकचा खर्च करावयाचा असल्यास परीक्षा शुल्कामध्ये वाढ अपरिहार्य ठरते. परंतु विद्यापीठाशी निगडीत पाचही जिल्हे हे रस्ते चांगले असणे गरजेचे आहे, हेही यावेळी खासदारांना पटवून देण्यात आले.आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांचे जिल्हे असल्याने विद्यार्थ्यांच्या परीक्षा शुल्कात वाढ करणे, योग्य नाही. त्यामुळे निधीसाठी इतरत्र विसंबून रहावे लागते. या श्रृंखलेत खासदार महोदयांनी मदत करावी, अशी विद्यापीठाची अपेक्षा आहे. तर विद्यापीठातील साधन–सामग्रीसाठी धडपडणारे डॉ. मिलींद बारहाते हे पहिले कुलगुरु मी पाहिले, असे म्हणत खासदार महोदयांनी निश्चित मदत करु, असे म्हटले आहे.

यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यापीठाचे अभियंता शशिकांत रोडे, माजी महापौर विलास इंगोले, स्थायी समितीचे माजी सभापती बडनेराचे प्रकाश बनसोड, प्रदेश कॉंग्रेसचे पदाधिकारी रामेश्वर अभ्यंकर, समाधान वानखडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# राज्यात अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे सर्व यंत्रणांना सतर्कतेचे निर्देश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९मुंबई**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज मंत्रालयातील राज्य आपत्ती व्यवस्थापन कक्षात संपूर्ण राज्यातील पावसाच्या स्थितीचा आढावा घेतला.यावेळी आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, माहिती तंत्रज्ञान मंत्री ड. आशिष शेलार, मुख्य सचिव राजेशकुमार, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, आपत्ती व्यवस्थापन अपर मुख्य सचिव सोनिया सेठी, कृषी विभागाचे प्रधान सचिव विकासचंद्र रस्तोगी, सार्वजनिक बांधकाम विभागाचे सचिव संजय दशपुते तसेच वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. यावेळी सर्व विभागीय आयुक्त, जिल्हाधिकारी दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे बैठकीत सहभागी झाले.




बैठकीत विभागीय आयुक्तांनी आपल्या विभागातील पावसाबाबतची माहिती सादर केली. रत्नागिरी, रायगड आणि हिंगोली जिल्ह्यांत अधिक पाऊस झाला असून, हवामान खात्याने १७ ते २१ ऑगस्टदरम्यान अतिवृष्टीचा इशारा दिला आहे. त्यामुळे पुढील काही दिवस सतर्क राहण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले.मागील दोन दिवसांत राज्यात विविध घटनांमध्ये सात जणांचा मृत्यू झाला आहे. कोकणातील काही नद्यांनी धोकापातळी ओलांडली असून जळगावमध्ये मोठे नुकसान झाले आहे. अलमट्टीबाबत कर्नाटक सरकारशी सातत्याने संपर्क ठेवला जात असून, सध्या धोका नसला तरी यंत्रणा सतर्क ठेवण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी दिले. मुखेडमधील परिस्थिती नियंत्रणात आली असून, विष्णुपुरीकडे विशेष लक्ष देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

छत्रपती संभाजीनगर विभागातील ८०० गावे बाधित झाली आहेत. दक्षिण गडचिरोलीत प्रशासन सतर्क आहे. अकोला, चांदूररेल्वे, मेहकर, वाशिम येथे परिस्थिती पूर्वपदावर येत आहे. विदर्भात प्राथमिक अंदाजानुसार २ लाख हेक्टर क्षेत्रावर पिकांचे नुकसान झाले आहे.

मुंबईत सकाळपासून अवघ्या आठ तासांत १७० मिमी पाऊस झाला आहे. शहरात पाणी तुंबल्यामुळे दोन ठिकाणी वाहतूक प्रभावित झाली. रेल्वे, मेट्रो व इतर वाहतूक सुरळीत सुरू आहे. पुढील १० ते १२ तास मुंबईसाठी अत्यंत महत्वाचे असून, प्रशासनाने काळजी घेण्याचे आदेश मुख्यमंत्र्यांनी दिले आहेत. उद्याच्या हवामानाचा अंदाज लक्षात घेऊन शाळांना सुटी जाहीर करण्याचा अधिकार स्थानिक प्रशासन व महापालिकांना देण्यात आला आहे.

मुख्यमंत्र्यांनी नागरिकांना दिलेल्या सूचनांमध्ये, एसएमएस अलर्ट पाठवताना वेळेचा अचूक उल्लेख करावा, येणारे अलर्ट गांभीर्याने घ्यावेत, स्वतःची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले. तातडीच्या मदतीसाठी मंत्रालय गाठण्याची गरज नाही, स्थानिक पातळीवरच निधी व अधिकार देण्यात आले आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले.

घरांच्या पडझडीसाठीची मदत, पंचनामे योग्य पद्धतीने करण्याचे निर्देशही देण्यात आले. धोक्याची पातळी वाढण्यापूर्वी अन्य राज्यांशी संपर्क साधण्यास सांगण्यात आले. पर्यटकांच्या ठिकाणी पोलिसांनी सतर्क रहावे, दरडी कोसळणाऱ्या भागात आधीच यंत्रणा कार्यरत करावी, तसेच निवारा केंद्रात भोजन, शुद्ध पाणी व पांघरूण यांची पुरेशी सोय करावी, असे आदेश मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी दिले.

# कृषीतज्ज्ञ, समाजसेवक अमिताभ पावडे यांचं अपघाती निधन; सामाजिक क्षेत्रात मोठी हानी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नागपूर**

ज्येष्ठ समाजसेवक, कृषीतज्ज्ञ, शेतकरी नेते, पर्यावरण विषयाचे गाढे अभ्यासक आणि एअरपोर्ट ऑथोरिटी ऑफ इंडियाचे माजी कार्यकारी अभियंता अमिताभ मोतीराम पावडे यांचे सोमवारी रस्ते अपघातात निधन झाले. ते ६१ वर्षांचे होते. अनेक संघटनांशी जुळून सामाजिक कार्यात सक्रिय असलेल्या अमिताभ पावडे यांच्या आकस्मिक निधनाने सामाजिक वर्तुळात शोककळा पसरली आहे. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी मोक्षधाम घाट येथे अंत्यसंस्कार करण्यात येईल. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगी व बराच मोठा आप्तपरिवार आहे.



मूळचे नरखेड तालुक्यातील येरला या गावचे रहिवासी अमिताभ पावडे यांनी नागपुरातल्या केंद्रीय विद्यालयातून प्राथमिक शिक्षण घेतल्यानंतर अमरावतीच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून पदवी प्राप्त केली. भारतीय विमानतळ प्राधिकरणात नियुक्त झाल्यानंतर अनेक वर्षे सेवा दिली. गुजरातच्या अहमदाबादचे विमानतळ, तसेच गुवाहाटी, भोपाळ व इंदूरच्या विमानतळाच्या निर्मितीत त्यांचे महत्त्वाचे योगदान राहिले आहे. एअरोनॉटिकच्या तांत्रिक बाबतीत निष्णात अभियंता असलेल्या पावडे यांनी आपल्या सेवाकाळात पूर्वोत्तर राज्यातील २४ विमानतळाच्या नियंत्रणाचे कार्य केले. त्यानंतर स्वेच्छानिवृत्ती घेत वडिलोपार्जित शेतीकडून पूर्णवेळ लक्ष दिले. सोबत सामाजिक क्षेत्रातही त्यांची सक्रियता वाढली.

**घराजवळच झाला अपघात**

अमिताभ पावडे हे धंतोलीतील साठे मार्गावर राहायचे. घराजवळच हा भीषण अपघात झाला. काही खासगी कामानिमित्त सायंकाळी ५.३० वाजता आपल्या सीडी १०० एम. व्ही. जे ७९०४ या दुचाकीने राठी हॉस्पिटल समोरील चौककडे जात होते. त्याच वेळी भरधाव वेगात आलेल्या एम. एच. ३१ एफ. ई. ६८२४ बुलेटची अमिताभ पावडे यांना धडक बसली. यात गंभीर जखमी पावडे यांना न्युरान हॉस्पिटल येथे दाखल करण्यात आले. मात्र मेंदूला झालेल्या अंतर्गत जखमांमुळे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. धंतोली पोलीसांनी गुन्हा दाखल करीत बुलेट चालकाचा शोध सुरू केला आहे.

# पेढी नदीला पूर, शेतपिकांचे नुकसान रस्ते जलमय, वीज पुरवठा खंडित



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

गेल्या चार दिवसांपासून कधी अधून-मधून तर कधी सतत बरसणाऱ्या पाऊसधारांनी अमरावतीसह जिल्ह्याच्या ग्रामीण भागात सोमवारीही पिच्छा पुरवला. पावसामुळे वलगावच्या पेढी नदीला पूर आला असून टाकरखेडा संभू भागातील रस्ते जलमय झाले आहेत. तिवसा तालुक्यातील मोझरी व इतर भागांतील शेते पाण्याखाली आली असून काही शेतांमधील पिके खरडून गेली आहेत. इतर गावांमध्ये वीज पुरवठा खंडित झाल्याच्या तक्रारी आहेत.

तिवसा तालुक्यातील सालोरा, वऱ्हा, शिरजगाव मोझरी, अनकवाडी या गावांमधील कापूस, सोयाबीन, तूर, ज्वारी व भाजीपाला पिकांचे मोठे नुकसान झाले. राज्य शासनाच्या निर्देशानुसार महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत नुकसानाचे सर्वेक्षण केले जात आहे. तिकडे पहाटे साडेसहा ते सातच्या दरम्यान झालेल्या मुसळधार पावसामुळे टाकरखेडा-आष्टी मार्ग पूर्णतः जलमय झाला असून रस्त्यावर साचलेल्या पाण्यामुळे नागरिकांची चांगलीच दमछाक होत आहे. रस्त्यावर पाणी साचल्याने वाहनचालकांना रस्ता दिसेनासा झाला आहे. प्रशासनाने तातडीने लक्ष देऊन पाणी उपसा करण्याची मागणी परिसरातील नागरिक व वाहनचालकांकडून होत आहे.पावसामुळे अनेक ठिकाणचा वीज पुरवठा खंडित झाला. या पावसाचा फटका ग्रामविकासाचा डोलारा सांभाळणाऱ्या जिल्हा परिषद मुख्यालयालाही बसला. दुपारच्या सुमारास अचानक आलेल्या मुसळधार पावसामुळे येथील वीज पुरवठा खंडित झाला. त्यामुळे काही काळ अख्खे मिनी मंत्रालय काळोखात बुडाले होते. जिल्हा परिषदेची बरीचशी कार्यालये दाटी-वाटीची असल्यामुळे काही कार्यालयांमध्ये तर अक्षरशः अंधार पसरला होता.

# चांदूर बाजार तालुक्यातील नुकसानग्रस्त गावांची लोकविकास संघटनेकडून पाहणी

## नुकसानग्रस्तांना मदत न मिळाल्यास आंदोलन करणार - गोपाल भालेराव



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९चांदूरबाजार**

चांदूर बाजार तालुक्यातील नुकत्याच झालेल्या ढगफुटी सदृश पावसामुळे व पुरामुळे माधान, काजळी, देऊरवाडा,शिरजगांव कसबा,कोदोरी,जसापूर,जमापूर,थुगांव पिंप्री, सोनोरी आदी गावातील व परिसरामधील शेतकरी व नागरिकांच्या घरांचे व शेतीचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले त्या ठिकाणी आज लोकविकास संघटनेचे संस्थापक अध्यक्ष गोपाल भालेराव व पदाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली असता मोठ्या प्रमाणात नागरिकांचे नुकसान दिसून आले नुकसान होऊन चार-पाच दिवसाचा कालावधी लोटून सुद्धा संबंधित नागरिकांना अजूनही प्रशासनाकडून कोणत्याच प्रकारची मदत देण्यात आली नाही करिता चांदूरबाजार तहसीलदार लक्ष्मीकांत तिवारी यांना भेटून तातडीने सर्वांना मदत देण्याबाबत विनंती करण्यात आली. येणाऱ्या काळात सर्वांना मदत न मिळाल्यास लोक विकास संघटने कडून आंदोलनाचा इशारा देण्यात आला.

# 'काटेपूर्णा' चे १० दरवाजे उघडले; ३८९ घरांचे नुकसान ६० हजार हेक्टर पिकांचे नुकसान, २६ जनावरांचा मृत्यू

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अकोला**



शहरासह ग्रामीण भागात सोमवारी तुफान पाऊस झाला. शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पाचे १० दरवाजे ६० सेमीने उघडून ४८० क्युसेक पाण्याचा विसर्ग नदीपात्रात करण्यात आला. प्राथमिक पाहणीनुसार ५९ हजार २८९ हेक्टर क्षेत्रातील पिकांची हानी झाली असून, ३८९ घरांचे नुकसान झाले. २६ जनावरांचा मृत्यू झाला. बाळापूर तालुक्यात जोरदार पाऊस झाला. मूर्तिजापूर तालुक्यात माना परिसरात मुसळधार पावसामुळे अनेकांच्या घरांची पडझड झाली. बार्शीटाकाळी-तालुक्य ातील पिंजरसह अन्य ठिकाणी धुवाधार पाऊस झाला. पातूर तालुक्यातील आलेगाव, चोंढी, सावरगावासह नदीकाठच्या गावांमध्ये तुफान पाऊस झाला. तालुक्यातील ५० हून अधिक गावांना पुराच्या फटका बसला. जिल्ह्यात २१ ऑगस्टपर्यंत पाऊस पडण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान केंद्राने वर्तवली आहे.

शहरात पहाटे काही वेळ जलधारा कोसळल्या होत्या. शहरातील पाणी पुरवठा करणाऱ्या काटेपूर्णा प्रकल्पाच्या धरण क्षेत्रात १६ मि.मी. पाऊस झाला होता. पातूर व बार्शीटाकळी तालुक्यात तुफान पाऊस झाला होता. मात्र, ऑगस्ट महिन्यातही पावसाने सरासरी ओलांडली नव्हती. दरम्यान गत दोन दिवस पावसाची संतत धार होती. मात्र सोमवारी सकाळपासूनच शहरासह ग्रामीण भागात तुफान पाऊस झाला. पुरामुळे पातूर तालुक्यातील काही रस्ते बंद झाले. यात आस्टूल, पास्टूल, झरंडी, अंधारसावंगी, पांढुर्णा, खामखेड, चोंढी, कोठारी बु, आगीखेडचा समावेश आहे. उर्वरित पान ४ तालुका गावं नुकसान अकोला १२० १६५८० मूर्तिजापूर १३३ ३७०९९ पातूर ३७ १६५५ बार्शीटाकळी ०३ १५ तेल्हारा ४१ २५०० अकोट ४० ४४० ५२ पैकी १० मंडळात अतिवृष्टी झाली. यात अकोला ७७.८८ मि.मी, घुसर ८२.८०, दहिहंडा ९९.८०, बोरगाव ८२,८०, पळसो ९८.५०, सांगळूद ८२.८०, कौलखेड ९०.३०, निंभा १२६.३०, माना ६७.३० आणि आलेगाव मंडळात ७४ मि.मी. पाऊस झाला.

# नांदगाव खंडेश्वर तालुक्यात स्मार्ट मीटरमुळे नागरिकांना दुप्पट वीज बिले

## शिवसेनेच्या नेतृत्वात विज वितरण कंपनीच्या कार्यालयात ठिय्या आंदोलन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९नांदगाव खंडेश्वर**

नांदगाव खंडेश्वर तालुक्यात वीज वितरण कंपनीने बसविलेल्या स्मार्ट मीटरमुळे दुप्पट विज बिले आल्याने नागरिक संतप्त झाले आहेत. ठाकरे गटाच्या शिवसेनेचे विधानसभा समन्वयक प्रकाश मारोटकर यांच्या नेतृत्वाखाली शेकडो नागरिकांनी विज वितरण कंपनीच्या कार्यालयावर धडक देत तब्बल एक तास ठिय्या आंदोलन केले.



नागरिकांचा आरोप आहे की, कंपनीने जुने मीटर नादुरुस्त असल्याचे कारण देत परवानगी न घेता स्मार्ट मीटर बसविले. विशेषत: सलोड व खानापूर झोपडपट्टी परिसरातील ६७ ग्राहकांच्या घरात तीन महिन्यांपूर्वी नवे मीटर बसवल्यापासून दर महिन्याला चार हजार रुपयांहून अधिक विज बिले येऊ लागल्याने सामान्य जनता हैराण झाली आहे.या आंदोलनादरम्यान नागरिकांनी वीज कंपनीच्या अधिकार्यांना चांगलेच धारेवर धरले. काही वेळ कार्यालयात तणाव निर्माण झाला होता. अखेर प्रभारी अभियंता अंबाडकर व सहाय्यक अभियंता बंड यांनी दोन दिवसांत सर्व स्मार्ट मीटर तपासून बिले दुरुस्त करण्याचे आश्वासन दिल्याने आंदोलन मागे घेण्यात आले.या वेळी शिवसेनेचे नेते शरद पाटील बोदडे, प्रफुल ठाकरे, राहुल वरखंडे, चेतन राऊत, रवी ठाकूर, गोपाल बनकर, गजानन वाघाडे, आदेश नेवारे, मुरलीधर सोनोने, विलास कांबळे, मंगेश इंझळकर, परमेश्वर शेंद्रे, सचिन मरापे, मारोतराव मसराम, निलेश ठाकरे, गणेश कांबळे, श्रावण कुसराम यांच्यासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

# तिवसा येथे ५२ पत्यांवर जुगार खेळणाऱ्यांवर छापा, साडेतीन लाखांचा मुद्देमाल जप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८अमरावती**

तिवसा येथील गोंडपूरा झेंडा चौक परिसरात ५२ ताश पत्यांवर जुगार खेळणार्यांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने छापा टाकून सात जणांना रंगेहात पकडले. त्यांच्या ताब्यातून तब्बल ३ लाख ४३ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.पोलिस अधीक्षक विशाल आनंद यांच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील अवैध धंद्यांवर आळा घालण्यासाठी ही कारवाई करण्यात आली. १७ ऑगस्ट रोजी गुप्त माहितीच्या आधारे पथकाने तिवसा पोलिस ठाण्याच्या हद्दीत कारवाई केली. छाप्यात आरोपी अश्विन रामकृष्ण धुर्वे (३७), साहेबराव लाकडे (५०), जयप्रकाश आकोटकर (५१), शेख जिब्राईल (४४), प्रशांत वानखडे (३३), मनोज नेवारे (४०) व कैलास सोनोने (४९) यांना ताब्यात घेण्यात आले.त्यांच्याकडून नगदी २१,९५० रुपये, सहा मोबाईल फोन (किंमत ४२ हजार), चार मोटारसायकली (किंमत २ लाख ८० हजार) आणि ५२ पत्ते असा एकूण ३ लाख ४३ हजार ९५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.आरोपींवर तिवसा पोलिस ठाण्यात गुन्हा क्र. ४८४/२०२५ कलम १२(अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.ही कारवाई अपर पोलिस अधीक्षक पंकज कुमावत, पोलिस निरीक्षक किरण वानखडे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक मुलचंद भांबुरकर, हवालदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजीया व हवालदार हर्षद घुसे यांनी केली.

# युवक काँग्रेसची तहसील कार्यालयावर धडक; शेतकऱ्यांना तातडीने मदतीची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१८तिवसा**

गेल्या काही दिवसांत तिवसा तालुक्यातील मोझरी, वर्हा, माळेगाव, शिरजगाव मोझरी, गुरुदेव मोझरी, शेंदोळा खुर्द, शिवणगाव, फत्तेपूर, धोत्रा, सालोरा, अंनकवाडी, मालधूर, रघुनाथपूर, शेंदोळा धसकट या गावांमध्ये ढगफुटी सदृश्य पावसामुळे नदी-नाल्यांना मोठ्या प्रमाणात पूर आला. या पुराच्या पाण्याने शेतकर्यांच्या शेतातील सोयाबीन, कपाशी, तूर आदी पिकांचे प्रचंड नुकसान झाले असून अनेक शेतांमधील पिके अक्षरशः मातीसकट वाहून गेली आहेत.



शेतकर्यांच्या हातातोंडाशी आलेला घास पावसाने हिसकावून घेतला असून, याशिवाय अनेक ठिकाणी विहिरी खचल्यामुळे शेतकरी दुहेरी संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर शेतकर्यांना तातडीने व सरसकट भरघोस मदत मिळावी, या मागणीचे निवेदन आज युवक काँग्रेसचे कार्याध्यक्ष जसबीर ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली तहसीलदार यांना देण्यात आले.या प्रसंगी सरपंच सुरज धूमनखेडे, अतुल खुडे, सुरज चौधरी, प्रवीण साबळे, आशिष बायस्कर, गुड्डू बायस्कर, युवराज ठाकूर, संकेत बारवाल, प्रमोद कदम, सोहम निमकर, अशोक सपाटे, प्रतीक खुडे, प्रणव बद्रे, संजय सुकलकर, प्रमोद टप्पे, प्रवीण बारई, जीवन क्षीरसागर, संतोष ऊके, उमेश साखरवाडे, प्रफुल लोमटे, मंगेश चोपकर, विलास धामणकर, गणेश धामणकर, अंबादास जुवारे, देविदास चोपकर, सचिन बारवाल, विनोद डेहनकर, अविनाश पाचघरे, विनीत पाचघरे, सचिन हगवणे, सत्यजीत पालंदुरकर, विवेक ठाकरे, मनोज साबळे, विकास तुरकणे, मंगेश मुंद्रे, स्वप्नील तुरकणे आदींसह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

# 'सर्जा-राजा'चा साजश्रृंगार दीडपटीने महागला

## शेतकऱ्यांची बाजारात गर्दी, यंदा सर्व वस्तूंच्या दरात सुमारे १५ ते २० टक्क्यांची वाढ



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

बळिराजाला वर्षभर शेतात राबण्यासाठी मदत करणाऱ्या सर्जा-राजाचा पोळा सण यंदा शुक्रवारी दि. २२ ऑगस्ट रोजी साजरा होत आहे. त्यानिमित्त बाजारपेठेत आपल्या लाडक्या सर्जा-राजाला सजवण्याकरिता साहित्य खरेदी करण्यासाठी शेतकऱ्यांची बाजारात गर्दी होत आहे. परंतु यंदा बैलपोळ्याला महागाईचा फटका बसला असून बैलांच्या साजाचे साहित्य १५ ते २० टक्क्यांना महागले आहे. बाजारपेठ साज साहित्याने गजबजली आहे.

भूमिपुत्रांसाठी वर्षभर राबणाऱ्या बैलांप्रती पिठोरी आमावस्येच्या दिवशी कृतज्ञता व्यक्त केली जाते. या सणासाठी राखी पोर्णिमा झाल्यानंतर शेतकऱ्यांची लगबग सुरू होते. प्रत्येक शेतकरी आपल्या ऐपतीनुसार आपल्या सर्जा-राजाला नवी आभूषणे खरेदी करतो. पाऊस चांगला झाला, तर शेतकरी मोठ्या प्रमाणात खरेदी करतात. मात्र, कमी झाला तर खरेदीसाठी हात आखडता घेतला जातो. यंदा जिल्ह्याच्या काही भागात पाऊस चांगला झाला असून, काही भागात कमी प्रमाण आहे. त्यामुळे खरेदीचे प्रमाण संमिश्र आहे. पोळयासाठी बाजारात विविध प्रकारचे गोंडे, गळ्यातील घुंगरांच्या माळा, घुंगरांचे चामडी नक्षीदार पट्टे, शिंगांना लाण्यात येणारी बेगडे, नक्षीदार झुल, विविध रंगांचे डब्बे, कासरा, म्होरकी, वेसण, भोंडे, सर, सूत (दावे), रेशम, घंटी, घुंगरे, तोडे, घुंगरमाळा, मुथळी, पट्टे, माळा, फुगे, भोरकडी, कंडा, शेंबी, शिंगदोरी, शिंगगोंडा, जोतं, चाबूक, मणिमाळ असे व अन्य साहित्य खरेदीसाठी शेतकऱ्यांची हळूहळू गर्दी होत आहेत. विविध प्रकारच्या सजावटींच्या सामानाने बाजारपेठ सजली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत मात्र खरेदीचा प्रतिसाद सध्या कमी असून, येत्या दोन दिवसांत वाढेल, असे व्यापाऱ्यांचे म्हणणे आहे.

### मातीच्या बैलजोडीला मोठी मागणी

पोळा सण साजरा करण्यासाठी घरोघरी मातीच्या बैलजोडीचे पूजन केले जाते. बाजारपेठेत पोळ्याच्या पार्श्वभूमीवर साहित्य विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. दुकानांमध्ये बैलांच्या साजासाठी कासरे, मोरक्या, घुंगरमाळा, कवडीच्या माळा, गळ्यातील चामडीचे पट्टे, वेसण, सुताचे गोंडे, बाशिंगासह शिंगांना लावण्यासाठी रंग विक्रीसाठी उपलब्ध झाले आहे. यंदा १५ ते २० टक्क्यांची वाढ झाली आहे.

# अचलपूर-परतवाडा येथे भाजपा जनसंपर्क कार्यालयाचे भव्य उद्घाटन

## मा. खासदार सौ. नवनित राणा यांच्या शुभहस्ते कार्यक्रम संपन्न



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

अचलपूर मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार प्रवीण तायडे यांच्या जनसंपर्क कार्यालयाचे उद्घाटन परतवाडा येथे उत्साहात पार पडले. खासदार व भाजपा नेत्या सौ. नवनित राणा यांच्या शुभहस्ते या कार्यालयाचे उद्घाटन करण्यात आले. या निमित्ताने भाजपाचे अनेक मान्यवर, कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून अचलपूर मतदारसंघातील सर्वसामान्य नागरिकांच्या समस्या थेट मांडल्या जाणार असून त्यांचे त्वरित निराकरण करण्यासाठी हे कार्यालय महत्वपूर्ण ठरणार आहे, असे खासदार सौ. नवनित राणा यांनी सांगितले.त्या म्हणाल्या, आमदार प्रविण तायडे हे खऱ्या अर्थाने जनतेचे आमदार आहेत. नागरिकांना थेट न्याय मिळावा, त्यांचे प्रश्न वेळेत सुटावेत यासाठी त्यांनी हे कार्यालय उभारले आहे. यामुळे मतदारसंघातील विकासकामांना गती मिळेल आणि लोकप्रतिनिधी व जनता यांच्यातील संवाद अधिक दृढ होईल.आ. प्रविण तायडे यांनी उद्घाटन सोहळ्यात बोलताना सांगितले की, हे कार्यालय म्हणजे फक्त राजकीय कार्याचे केंद्र नसून, सर्वसामान्य नागरिकांसाठी सेवा केंद्र असेल. विकासकामांपासून व्यक्तिगत अडचणींपर्यंत नागरिकांच्या प्रत्येक प्रश्नाचे योग्य तोडगे काढण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन त्यांनी दिले.या उद्घाटन सोहळ्यात आ. केवलराम काळे, प्रमोद कोरडे, सुंदर यादव,अतुल वाट, भूषण कांबळे, रुपेश ढेपे, अशोक डहाने, उपेन बछले, रविंद्र गवई, विपुल वासनकर, नितीन धुरटकर, बबलु वानखेडे, दिनेश बछले यांसह अनेक पदाधिकारी व नागरिक उपस्थित होते.या कार्यक्रमानंतर नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण होते. स्थानिक कार्यकर्त्यांनी व नागरिकांनी या जनसंपर्क कार्यालयामुळे आपले प्रश्न आता अधिक सुलभपणे मांडता येतील आणि त्यावर त्वरित कार्यवाही होईल, असा विश्वास व्यक्त केला.

# मेळघाटात मानव-वन्यप्राणी संघर्ष तीव्र

## वाघाच्या हल्ल्यात युवक ठार, दुसरा बेपत्ता

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९चिखलदरा**



मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या सीमावर्ती भागात पुन्हा एकदा नरभक्षक वाघाचा धुमाकूळ सुरू झाला आहे. चिखलदरा तालुक्यातील कुलंगना गावाच्या हद्दीत सोमवारी (दि. १९ ऑगस्ट) सकाळी झालेल्या भीषण हल्ल्यात एका युवकाचा मृत्यू झाला असून दुसरा युवक बेपत्ता असल्याची प्राथमिक माहिती समोर आली आहे.

गावकरी व स्थानिक सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, सकाळी काही युवक जंगल परिसरात गेले असता अचानक वाघाने त्यांच्यावर झडप घातली. या हल्ल्यात एका युवकाचा जागीच मृत्यू झाला. दुसरा युवक वाघाच्या तावडीत सापडून बेपत्ता झाला असून त्याचा शोध सुरु आहे. घटनेनंतर परिसरात भीतीचे व दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

गेल्या पाच महिन्यांत मेळघाट व्याघ्र प्रकल्प परिसरात वाघांच्या हल्ल्यात चौघांचा मृत्यू झाला आहे. त्यामुळे स्थानिक नागरिकांत तीव्र नाराजी असून वनविभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. ग्रामीण भागातील लोकांच्या उपजीविकेचा मोठा भाग जंगलाशी जोडलेला असल्याने रोजच्या कामासाठी जंगल परिसरात जाण्याशिवाय पर्याय नसतो. मात्र वारंवार होणाऱ्या हल्ल्यामुळे नागरिक भयभीत झाले आहेत.

दरम्यान, घटनेची माहिती मिळताच व्याघ्र प्रकल्पाचे अधिकारी, बचाव पथक, रेस्क्यू टीम आणि पोलिस अधिकारी घटनास्थळी दाखल झाले असून पुढील तपास सुरू आहे. वाघाच्या हालचालींवर लक्ष ठेवण्यासाठी पिंजरे उभारणे, ट्रॅप कॅमेरे बसविणे आणि परिसरातील नागरिकांना सावधानतेचे निर्देश देण्याचे काम सुरू आहे.ग्रामीण भागात सातत्याने होणारे वाघांचे हल्ले थांबविण्यासाठी स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी तातडीने ठोस उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

# केवळ ९८१ आरएफओंच्या खांद्यावर राज्याच्या वनांचा डोलारा; वने व वन्यजीवांच्या संरक्षणाचा प्रश्न गंभीर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**



महाराष्ट्रात वाघांची संख्या वाढत असली, तरी व्याघ्र प्रकल्पांना मनुष्यबळाच्या कमतरतेचा फटका बसत आहे. राज्यातील वनविभागात आरएफओंच्या तब्बल ९८१ पदांची टंचाई आहे, त्यातच ३५० पदांची भरती रखडली आहे. परिणामी, वने व वन्यजीवांच्या संरक्षणाचा प्रश्न गंभीर बनला आहे.

राज्याच्या भौगोलिक क्षेत्रापैकी केवळ १८ टक्के वनक्षेत्र शिल्लक असून, गेल्या दशकात वनवाढीचा आलेख अत्यंत मंदावलेला आहे. पोलिस खात्यात जवळपास दोन लाखांचा ताफा कार्यरत असताना वनविभागातील अधिकारी व कर्मचारीसंख्या नगण्य आहे. त्यामुळे वन्यजीव संवर्धन आणि जैवविविधतेच्या रक्षणावर प्रतिकूल परिणाम होत असल्याचे वास्तव समोर आले आहे. वनविभागात प्रादेशिकची केवळ २५० परिक्षेत्रे असून, अनेक ठिकाणी एका परिक्षेत्रात दोन ते तीन तालुक्यांचा समावेश आहे. त्यामुळे वनसंरक्षणाच्या कामावर थेट परिणाम होत आहे. काही काळापूर्वी प्रादेशिक परिक्षेत्राची पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव शासनाला पाठविण्यात आला होता; मात्र त्यावर पुढील पाठपुरावा न झाल्याने सध्या एका परिक्षेत्राला तीन तालुक्यांचा व्याप सांभाळावा लागत आहे. विशेष म्हणजे, प्रादेशिक परिक्षेत्रांची वाढ सामाजिक वनीकरणातील परिक्षेत्र कमी करून केली, तर शासनावर नवीन पदे भरण्याचा बोजा पडणार नाही.

### आरएफओंची पदे अत्यंत कमी

राज्यात व्याघ्र प्रकल्पांची संख्या ६ असून, अभयारण्यांची संख्या ४८ पेक्षा अधिक आहे. असे असताना केवळ ९८१ पदांवर वनविभागाचा डोलारा उभा आहे. आरएफओ हे वनविभागातील महत्त्वाचे पद असून, प्रादेशिक, वन्यजीव, मूल्यांकन, सामाजिक वनीकरण आणि शिक्षण अशा विविध उपविभागांत ही पदे विभागली गेल्याने कामकाजावर गंभीर परिणाम झाल्याचे चित्र समोर आले आहे.

### ३५० पदे सामाजिक वनीकरणात अडकली

वनविभागातील सामाजिक वनीकरण विभागात ठोस कामे नसतानाही तब्बल ३५० आरएफओ कार्यरत आहेत. तर दुसरीकडे वन्यजीव, प्रादेशिक विभागामध्ये आरएफओंची शेकडो पदे रिक्त आहेत. राज्याच्या प्रत्येक जिल्ह्यात सामाजिक वनीकरणात १० ते १४ आरएफओ कार्यरत आहेत. सामाजिकमध्ये तालुकास्तरावरही आरएफओ आहेत. याउलट, वन्यजीव व प्रादेशिक विभागात जिथे जबाबदारी अधिक आहे, तिथेच शेकडो आरएफओंची पदे रिक्त असल्याचे गंभीर वास्तव समोर आले आहे. प्रादेशिक परिक्षेत्राची पुनर्रचना केव्हा?

# पुर्णा मध्यम प्रकल्पातून विसर्ग सुरू नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९चांदूर बाजार**

पुर्णा मध्यम प्रकल्प, विश्रोळी येथे पाणलोट क्षेत्रात सतत होत असलेल्या मुसळधार पावसामुळे प्रकल्पाच्या जलसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. आज दि. १९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९:०० वाजता प्रकल्पाची जलपातळी ४४९.९८ मीटरवर पोहोचली असून, उपयुक्त पाणी साठा २६.६८ द.ल.घ.मी. (७५.४५%) इतका झाला आहे.

मंजूर जलाशय पातळीनुसार ३१ ऑगस्ट अखेर ७६.३३% इतका पाणीसाठा नियंत्रित ठेवणे आवश्यक आहे. मात्र सध्या पावसाचा जोर कायम असल्यामुळे पाण्याची आवक वाढत आहे. त्यामुळे पाणीसाठा संतुलित ठेवण्यासाठी प्रकल्प प्रशासनाने विसर्ग सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे.

आज सकाळी ११:०० वाजता धरण प्रचलन सुचीनुसार एकूण ९ पैकी २ दरवाजे प्रत्येकी १० से.मी. उंचीवरून उघडण्यात आले असून, यामधून १५.९४ घन मी./से. इतका पाण्याचा विसर्ग पुर्णा नदी पात्रात सोडण्यात आला आहे.प्रकल्पात येणाऱ्या पाण्याची आवक लक्षात घेऊन विसर्ग वाढविणे किंवा कमी करण्याचा निर्णय पुढील काही तासांत घेण्यात येणार आहे. यामुळे नदीकाठच्या गावांनी सतर्क राहावे तसेच संबंधित यंत्रणांनी आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन पुर नियंत्रण कक्षाने केले आहे.

# गणरायांसाठी सजावटीचे साहित्य खरेदीस वेग

## मजबूत धातूचे विविध आकारातील मखर, लोखंडी मंडप तयार करून घेण्याकडे कल

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९अमरावती**

अवघ्या आठ दिवसांवर येऊन ठेपलेल्या गणेशोत्सवासाठी शहरातील बाजारपेठा बाप्पांना सजवण्यासाठी विविध रंगी, विविध प्रकारच्या वस्तूंनी फुलून गेल्या आहेत. मूर्ती, फुलांच्या तसेच विजेच्या माळा, सजावट साहित्यांनी स्टॉल्स सजलेले दिसत आहेत. गणरायांच्या साज-शृंगारात कोणतीही उणीव राहू नये, देखणी मूर्ती आणखी आकर्षक दिसावी या उद्देशाने साहित्य खरेदीसाठी गणेशभक्तांची बाजारपेठेत गर्दी वाढू लागली आहे.



शहरातील विविध चौकांमध्ये आतापासूनच मूर्ती, कृत्रिम फुलांच्या तसेच विद्युत रोशनाईच्या माळा, सजावट साहित्यांनी स्टॉल्स सजलेले दिसत आहेत. विविध आकाराचे जोडता येणारे मखर बाजारात उपलब्ध आहेत. यात काही मखर हे धातूपासून निर्मित असून ते पुढील काही वर्षे सहज वापरता येतील असे आहेत. यात पितळ, तांबे, पोलादाचा वापर केलेला आहे. त्यांची किंमत आकारानुसार १५०० ते १० हजार रुपयांपर्यंत आहे. विघ्नहर्त्यासाठी अनेकांनी लोखंडी मंडप तयार करून त्यावर कापडी छत, मागे व बाजूला सुंदर पडदे, झालर विकत घेतली आहे. हे लहान मंडप नट, बोल्टद्वारे जोडता येतात. त्यांची किंमतही वजनानुसार किमान २ हजारापासून पुढे आहे. गणेशोत्सवनिमित्त राज्याबाहेरूनही अनेक पथविक्रेते उत्सवाचे साहित्य विकण्यासाठी शहरात दाखल झाले आहेत. ते प्रामुख्याने प्लास्टिक फुलांच्या माळा, मोरपंख, कापड, रंग, विद्युत माळा या साहित्याची विक्री करत आहेत. लाल, पिवळ्या गोंड्यांचे हार, मोत्यांचे हार आणि सॅटन रिबनपासून बनलेले हार, सोंड पट्ट्या, हातातील तोडे, कानांच्या पाळ्यांमधील दागिने, जानवे या वस्तू गणेश भक्तांसाठी आकर्षण ठरताहेत.

# तिवसा तालुक्यात अतिवृष्टीने शेतीचे प्रचंड नुकसान : माजी मंत्री यशोमती ठाकूर यांनी केली पाहणी

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१९ तिवसा**

१५ व १६ ऑगस्ट रोजी रात्री झालेल्या ढगफुटी सदृश्य पावसामुळे तिवसा तालुक्यातील नदीकाठ व नाल्याकाठच्या शेतकऱ्यांची शेती अक्षरशः खरडून गेली. मोठ्या प्रमाणावर शेती व पिकांचे नुकसान झाले असून पंचनाम्याला विलंब होत असल्याने शेतकऱ्यांची चिंता वाढली आहे. या पार्श्वभूमीवर राज्याच्या माजी महिला व बालकल्याण मंत्री तथा माजी आमदार यशोमतीताई ठाकूर यांनी नुकतेच तिवसा तालुक्यातील विविध नुकसानग्रस्त भागांचा दौरा करून प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी बोलताना ठाकूर म्हणाल्या की, भिवापूर तलावाचे निकृष्ट दर्जाचे काम झाल्यामुळे भविष्यात शेतकऱ्यांच्या जीवित व संपत्तीला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो. तलावामुळे कुरा व भिवापूर गावात प्रचंड नुकसान होण्याची शक्यता आहे. त्यांनी या संदर्भात पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांना व्हिडिओ कॉल करून परिस्थिती दाखवून तातडीने उपाययोजना करण्याच्या सूचना दिल्या.

घोटा येथील पाझर तलावास गळती लागल्यामुळे घोटाळे गावात पाणी शिरण्यास सुरुवात झाली असून सतत पाऊस झाल्यास घोटा गाव पाण्याखाली जाण्याची भीती असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याबाबतही संबंधित विभागाला त्वरित कार्यवाहीचे आदेश दिले.अनकवाडी, वऱ्हा, माळेगाव, धोत्रा या गावांतील शेतशिवारांची पाहणी करून ठाकूर यांनी शेतकऱ्यांना धीर दिला. त्यांनी म्हटले की, सरकारच्या सुलतानी धोरणामुळे शेतकऱ्यांचे हाल होत आहेत. अतिवृष्टी व अस्मानी संकटामुळे त्रस्त झालेल्या शेतकऱ्यांना तातडीने सरसकट हेक्टरी भरघोस मदत मिळाली पाहिजे. शेतकरी राजा संकटात आहे आणि त्याला त्वरित मदतीची गरज आहे.

# दिघी महल्ले शेतशिवारातील जुगार अड्ड्यावर छापा

**विदर्भ प्रजासत्ताक दि१९ अमरावती**

स्थानिक गुन्हे शाखा, अमरावती ग्रामीण पोलिसांनी मंगरुळ दस्तगीर हद्दीतील दिघी महल शेतशिवारातील जुगार अड्ड्यावर कारवाई करत नऊ जणांना अटक केली. त्यांच्याकडून सुमारे ४ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.१८ ऑगस्ट रोजी गुप्त माहितीच्या आधारे पोलिसांनी बबलु ढाकुलकर यांच्या शेतावर छापा टाकला. येथे काही इसम 'एक्का बादशाह' नावाच्या पत्त्यांच्या खेळावर मोठ्या रकमेचा जुगार खेळत असल्याची माहिती मिळाली होती.



छाप्यात अक्षय मारोतराव ठाकरे (३०), गणेश विजयराव खंडारे (४१), पंकज अरुण ठाकरे (२९), कपील सुभाष कोहळे (२३), अभिषेक मुरलीधर भबुतकर (३५), जलील शहा दिलावर शहा (२८), अताउल्ला खान रहेमत खान (३१), युवराज रघुनाथ नेवारे (५३) आणि हरिष दिनकर महल्ले (४०, सर्व रा. मंगरुळ दस्तगीर) यांना रंगेहात पकडण्यात आले. त्यांच्याकडून ६३ हजार ६३० रुपये रोख, १ लाख ८ हजार रुपये किमतीचा मोबाईल, ३ मोटरसायकली किंमत २ लाख ३० हजार रुपये व ५२ पत्त्यांचा संच असा एकूण ४ लाख १ हजार ६३० रुपयांचा मुद्देमाल जप्त झाला.सदर आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन मंगरुळ दस्तगीर येथे गुन्हा दाखल करून कलम १२(अ) म.जु.का. अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्या आदेशानुसार, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वात करण्यात आली. कारवाईत पो.उपनिरीक्षक मुलचंद भांबूरकर, अमंलदार मंगेश लकडे, सचिन मसांगे, दिनेश कनोजीया व चा.पो. संजय प्रधान सहभागी होते.